भारतीय कऱ्हाडे ब्राह्मण महासंघ
ॐ
स्थापना १९८१

# संपर्क

**संपर्कात राहु या ! संपर्क वाढवू या !!**

कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाने कऱ्हाडे ज्ञाती बांधवांसाठी
चालविलेले नियतकालिक (खाजगी वितरणासाठी)





**वर्ष ९ वे** | **ऑक्टोबर – डिसेंबर २०१४** | **अंक ३ रा**



**अध्यक्षः श्री. आनंद पराडकर**
**मो.नं ९३२६८२६८८४**

**सचिवः श्री. गोपाळ भाटवडेकर**
**मो.नं ९८५०९७९७०६**

**कोषाध्यक्षः श्री. चंद्रशेखर जोशी**
**मो.नं ९४४९०५१६५३**



संपादक मंडळ

**मुख्य संपादक :**
**श्री. गणेश गुर्जर**
९८९०९९०११३
**श्री. श्रीगजानन गुर्जर**
पुणे, ९९७०१७४८१८
**श्री. मकरंद फणसळकर**
पुणे, ९८२२६१७३२४

**शहर प्रतिनिधी :**
श्री. दिलीप धोपेश्वरकर, मुंबई, ९८२०५२१०९८
श्री. चंद्रशेखर जोशी, बेळगांव, ९४४९०५१६५३
श्रीमती स्वाती प्रभुदेसाई, डोंबिवली, ९७६९३२९९९३
श्री. अविनाश जावडेकर, नागपूर, ९८६०२५७३१५
सौ. अंजली माईणकर, सोलापूर, ८८८८२२१७४६
सौ. मानसी मोघे, सातारा, ०२१६२–२३३६४३
श्री. सुनिल जठार, रत्नागिरी/राजापूर, ९२७०५७९४००
श्री मिलींद पावनगडकर, कोल्हापूर, ९२२५८००५८७
श्री. जयंत लघाटे, मुलुंड, ९९६९०३७३४१
श्री. हेमंत पुराणिक, पुणे, ९९२३८१०१९४
श्री. नरेंद्र पानवलकर, बडोदा, ९२२७१३५७९४
श्री. शरद खांडेकर, सांगली, ९८२२९९५८९२
श्री. चंद्रशेखर आठल्ये, ठाणे, ९८६९६७४९५८
सौ. सुप्रिया फणसळकर, नाशिक, ९४०३१४८७७५
श्री. विनायक उमर्ये,आजगांव,जि. सिंधुदुर्ग, ९४२३८९०१३८



**ऑफिस संपर्क : ८१४९९०७७८९**
email : bkbmsindia@gmail.com



**भारतीय कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाचे संपर्क हे त्रैमासिक मालक, भारतीय कऱ्हाडे ब्राह्मण महासंघ (ट्रस्ट) यांचेसाठी मुद्रक व प्रकाशक गोपाळ भाटवडेकर यांनी एकविरा प्रकाशन, कर्वेनगर, पुणे येथे छापून ४३७, नारायण पेठ, अनिश प्रसाद अपार्टमेंट, पुणे ४११०३० येथे प्रसिद्ध केले. संपादक – गणेश गुर्जर**


## आवाहन

'संपर्क'च्या सर्व वर्गणीदारांस या द्वारे आवाहन करण्यात येते की आपली वार्षिक वर्गणी रू. १००/– (रूपये शंभर मात्र) आपल्या शहर प्रतिनिधींकडे जमा करावी. शहर प्रतिनिधींकडे प्रत्येक सभासदाची वर्गणी कोणत्या महिन्यापासून येणे आहे, त्याच्या याद्या पाठवल्या आहेत. त्यानुसार शहर प्रतिनिधींशी संपर्क करून वर्गणी जमा करावी. शहर प्रतिनिधींनी जमा झालेली वर्गणी आपल्या नजिकच्या बँक ऑफ इंडियाच्या शाखेत भारतीय कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाच्या खाते क्रमांक ०५०५१०११०००९४१० वर लक्ष्मीरोड, पुणे शाखेमध्ये जमा करून यादी आणि जमा पावती पुणे कार्यालयाकडे पाठवावी. बँक ऑफ इंडिया, IFSC Code BKID0000505 कोणत्याही अंकापासून वर्गणीदार होता येते. किरकोळ अंक विक्री नाही.

**संपादक**
**– गणेश गुर्जर**

## जाहिरातीचे दर

| पान | एकवेळ | चारवेळा |
|---|---|---|
| पाव | ४००/– | १५००/– |
| अर्धा | ८००/– | ३०००/– |
| पूर्ण | १६००/– | ६०००/– |
| शुभेच्छा | २५०/– | १०००/– |
| पुर्ण पान रंगीत | २५००/– | १००००/– |


**नियतकालिकाचे नाव :** भारतीय कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाचे 'संपर्क'
**पत्ता :** भारतीय कऱ्हाडे ब्राह्मण महासंघ,
**द्वारा :** कऱ्हाडे ब्राह्मण संघ, ४३७, नारायण पेठ,
'अनिश प्रासाद' अपार्टमेंट्स, भटांचा बोळ,
पुणे – ४११ ०३०
**संपादक :** श्री. गणेश गुर्जर
**मुद्रक :** एकविरा प्रकाशन आणि प्रसिद्धी सेवा,
स.नं.१/२७ व २९, माऊली सोसायटी, अपर्णा हाऊस समोर,
विठ्ठल मंदिरामागे, कर्वेनगर, पुणे – ४११ ०५२.

संपर्क

# अनुक्रम


| | |
|---|---|
| ४ | **बकुळफुले - ताबा** |
| ५ | **विज्ञान वार्ता** |
| ७ | **पत्रप्रतिसाद** |
| ८ | **व्यक्ति परिचय - आद्य मराठी कादंबरीकार वेदशास्त्र संपन्न लक्ष्मणशास्त्री मो. हळबे** |
| ११ | **बिंदी** |
| १३ | **लोहगड ....मोहीम फत्ते!!** |
| १४ | **वधू वर माहिती** |
| १९ | **कॅमेऱ्याच्या कोनातून** |
| २० | **पाककृती** |
| २२ | **मॅट्रीक्स थेरपी - २१ व्या शतकातील औषधोपचार** |
| २२ | **आई** |
| २४ | **रुग्ण दिलासा - वैद्यकीय व सामाजिक मार्गदर्शन** |
| २४ | **गेले द्यायचे राहुनि तुझे नक्षत्रांचे देणे** |
| २६ | **संस्थावृत्त** |
| २६ | **एक मुलखावेगळा अनोखा छंद - गणेश मूर्तींचा** |
| २७ | **कैलास मान सरोवर यात्रा - भाग २** |


सदर नियतकालिकातील मजकूराशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. **- संपादक**

संपर्क



# संपादकीय

लोकसभेच्या निवडणुका संपून ३ महिने झाले नाहीतर महाराष्ट्र राज्याच्या विधानसभा निवडणुकीची धामधूम सुरु झाली सर्व आघाड्या युतीमधल्या कुरबुरी जनतेसमोर आल्या आणि आघाडी तुटली तर युती बिघडली. या सर्व पक्षांमध्ये आपसात मतभेद आहेत तर हे जनतेचे हित काय करणार आणि म्हणूनच पक्षाचे राजकारणी आपणास अमिषे दाखवतील आणि मते मागतील पण आपल्या सर्व ज्ञाती बांधवांना आग्रहाची विनंती की पक्ष न बघता उमेदवार बघा त्यातल्या त्यात ब्राह्मण उमेदवार निवडा आणि तो जर नसेल तर ज्याचे अस्तित्व वादातीत आहे अशा उमेदवाराला निवडा पण मतदान नक्की करा आणि आपले राष्ट्रीय कर्तव्य पूर्ण करा. असो !

'संपर्क' बाबत बोलायचे झाले तर त्यास आता चांगला प्रतिसाद मिळत आहे. जुने सभासद नूतनीकरण करत आहेत तर बऱ्याच जणांनी नवीन सभासदत्व स्विकारले. सभासद संघाकडून लेखन साहित्य येत आहे तसेच संपर्कचे सभासद लेख, कविता आणि अन्य साहित्य पाठवून आपला सहभाग वाढवत आहेत ही खरोखरच आनंदाची आणि अभिमानास्पद गोष्ट आहे. जाहिरातदारांकडून ही आम्हास उत्तम प्रतिसाद मिळत आहे ही आनंदाची गोष्ट आहे.

ठाणे संघाने एक चांगला उपक्रम हाती घेतला आणि एक वर्षात त्यांनी ''कऱ्हाडे ब्राह्मण बिझीनेस फोरम'' ही संकल्पना राबवून कऱ्हाडे ज्ञातीमधील व्यावसाईकांना एक प्लॅटफॉर्म मिळवून दिला. ही संकल्पना सर्व कऱ्हाडे ब्राह्मण संघानी अंगीकारावी असे आवाहन पितांबरीचे श्री. रविंद्र प्रभुदेसाई यांनी उपस्थित संघ प्रतिनिधींना केली यास प्रतिसाद म्हणून कऱ्हाडे ब्राह्मण संघ पुणे यांनी पुण्यास आता ती कार्यान्वयीत होण्याचे काम सुरु आहे.

दसरा झाला आणि आता दिवाळी, ख्रिसमस, मकर संक्रांत असे सण एकापाठोपाठ येत आहेत. आपण निश्चितच या सणांचा आनंद लुटणारच आहोत पण याक्षणी आपण अशा अनेक जणांची, की जे आपले ज्ञाती बांधव हा आनंद लुटू शकत नाहीत त्यांची आठवण ठेवून त्यांच्या दिवाळी मकर संक्रांतीच्या सणांचा आनंद लुटण्यास सहकार्य करणे आपले कर्तव्य आहे. यासाठी प्रत्येक संघातर्फे, सभासदांतर्फे फुल ना फुलाची पाकळी म्हणून आपल्या आनंदाचा वाटा रोख रकमेच्या स्वरुपात संघाकडे सुपूर्द करावा आणि संघाने आपल्या शहरातील अशा संस्थांना ही मदत पोहोचती करावी मग ती दिवाळी फराळ स्वरुपात असो अुवा कपडे, वह्या, पुस्तकांच्या स्वरुपात असो ही निश्चितच उपयोगी होईल अशी विनंती आहे.

दीपावलीच्या शुभ पर्वाच्या आणि नववर्षाच्या हार्दिक शुभेच्छा !



# 'बकुळफुले'

**डॉ. श्रीकृष्ण जोशी**
रत्नागिरी

**खाण्याच्या बाबतीत आणि बोलण्याच्या बाबतीतको असं म्हणतात की जीभ ही धारदार चाकूसारखी असते. ती रक्त न वाहणारी जखम करू शकते. जीभ ही नागीण असते. शब्दांच्या दंशानं विखार पसरवू शकते आणि जीभ साखरेचा अंशही असते. जीवनात गोडवा पसरवण्याच्या मधुर वाणीच्या रुपात मनं अभंग ठेवू शकते.**

# ताबा

जिभेवरचा ताबा ही मोठी विलक्षण गोष्ट आहे. जिभेला हाड नसणे, जीभ फारच सैल असणे, जीभ वळवळणे अशा अनेक वाक्यप्रयोगातून जिभेबद्दल बोललं जातं. माणसासह अनेक प्राणीमात्रांच्या तोंडातील एक महत्त्वाचा अवयव इतकं त्याचं महत्वाचं स्थान असलं तरी इतर प्राणीमात्र आणि माणूस यांच्या जिभेबाबत खूपच भिन्नता आहे. आकार, उपयोग यामुळं माणसाची जीभ आणि मानवेतर प्राण्यांची जीभ यात वेगळेपण आहे. माणूस हा विचार करणारा असल्यामुळं तो जिभेचा जसा वापर करतो तसा इतर प्राणी करत नाहीत. आजारपणात डॉक्टर जीभ तपासतात. पण तो लक्षण शोधण्याचा असा एक भाग असतो. औषध उपाययोजना करतांना तो शोध उपयुक्त ठरतो. जिभेचा आणखी एक प्रयोग आहे तो म्हणजे नाकाला जीभ लावण्याचा. जीभ एक अवयव म्हणून नाकाला लावणारा हजारात एखादा असला तरी नाकाला जीभ लावण्याची वृत्ती असणारे शंभरात अनेकजण सापडतात. अशक्य कोटीतील गोष्ट म्हणून जसे त्याकडे पाहणारे असतात तसे अहंकारी वृत्तीने नाकाला जीभ लावण्याचे काम करणारे अनेक असतात. क्षमता नाही हे माहीत असून सुद्धा दुसऱ्याच्या कर्तृत्वाला कमी लेखण्यासाठी नाकाला जीभ लावण्याची वृत्ती कामाला येते.

अर्थात जीभ पुराण हे इतक्या मर्यादित स्वरुपात मला सांगायचं नाही. जिभेवरचा ताबा ही गोष्ट आपल्या एकूणच व्यक्तिमत्वातला अविभाज्य भाग असतो, हे मला सांगायचं आहे.

आपण सर्वचजण कमी अधिक प्रमाणात खवय्ये असतो. रसिक खवय्ये असतो. चवीढवीने जिभेचे चोचले पुरवित असतो. पण ते पुरवताना सार्वजनिक ठिकाण आणि घर असा भेद कळत नकळत आपण करतो. मॅनर्स पाळतो. मर्यादा पाळतो. वाढत्या वयानुसार शरीराची काळजी घेत जिभेचे चोचले पुरवतो. सर्वजनिक ठिकाणी अन्न खाण्यापेक्षा टाकण्याकडे कल असेल, तर आपण आपल्या या वृत्तीचा पुनर्विचार करायला हवा. कारण अद्यापही आपल्या समाजात दोन वेळच्या अन्नाची भ्रांत असणारे अनेकजण आहेत. अशा वेळी केवळ गंमत, रिवाज, शैली वा प्रतिष्ठा म्हणून अन्न टाकण्यापेक्षा माफक, मर्यादित, माणुसकीच्या नात्याने उदरभरण करणं हिताचं असतं. असा विचार एकट्याने करून काय होणार असंही काही म्हणत असतात. पण असा विचार एकानं केला दुसऱ्यानं त्याचं अनुकरण केलं की ही एक चळवळ बनून जाईल. एका दिव्यानं दुसरा दिवा लावला. दुसऱ्या दिव्यानं तिसरा दिवा लावला की अंधार जसा नाहीसा होतो तसं अन्न वाचवण्याच्या चळवळीला उर्जितावस्था येईल. अर्थात हजारात एखादा नाकाला जीभ लावणारा असतो. खरंतर ती एक कसरत असते. केवळ अन्नाच्या बाबतीतच जिभेवर नियंत्रण हवं असं नाही. जिभेवर नियंत्रण हवं ते बोलण्याच्या बाबतीतसुद्धा. बेताल, बेफाम आणि बेलगाम बोलणाऱ्यांनी जिभेवर ताबा ठेवणं अत्यंत आवश्यक असतं. मुळात तोंडात खडीसाखरेचा खडा नित्य असावा असं म्हटलं जातं. ते केवळ तोंड गोड करण्याकरता नाही किंवा खरोखरीचा खडा असावा असंही नाही. आपलं बोलणं गोड असायला हवं, अशा अर्थानं तो वाक्प्रचार वापरला जातो. माणसाची एक ओळख असते. संतापी, निष्ठूर, कटू शब्दांनी दुसऱ्याला जखमी करणारा आणि दुसरी ओळख असते ऋजु, नम्र, लाघवी आणि गोड बोलून दुसऱ्याला आपलंसं करणारा. दुसरी ओळख ही माणूस जोडणारी आणि पहिली ओळख मनं तोडणारी. अनेक कामं गोड बोलण्यानं जितकी सहजसाध्य होतात तितकी अन्य कुठल्याही बोलण्यानं होत नाहीत. जबरदस्तीनं तर नाहीच नाही. हे गोड बोलणं आपल्या हाती असतं. किंबहुना कुठलंही कटू काम किंवा अप्रिय असणार सत्य सुद्धा शर्करावगुंठनानं करता येतं. हे शर्करावगुंठन म्हणजेच गोड बोलणं. ते जीभेवर ताबा या शब्दातून सांगितलं जातं. मनावरचं नियंत्रण जिभेवर उतरावं लागतं. जीभ सैल सुटली की, माणसं तुटतात. मनं दुभंगतात आणि जीभ बेलगाम बनली की युद्धज्वर अंगी भिनतो. म्हणून संयम, नियंत्रण या गोष्टी जिभेसाठी आवश्यक असतात. खाण्याच्या बाबतीत आणि बोलण्याच्या बाबतीत असं म्हणतात की जीभ ही धारदार चाकूसारखी असते. ती रक्त न वाहणारी जखम करू शकते. जीभ ही नागीण असते. शब्दांच्या दंशानं विखार पसरवू शकते आणि जीभ साखरेचा अंशही असते. जीवनात गोडवा पसरवण्याच्या मधुर वाणीच्या रुपात मनं अभंग ठेवू शकते. या जिभेवर ताबा कसा मिळवायचा हे आपल्या हाती असतं, चाकू, नागीण आणि गोड शब्द यातला पर्याय आपणच निवडायचा असतो.

# विज्ञान वार्ता

**डॉ.प्रमोद मोघे**
**पुणे**

मागील अंकामध्ये सांडपाणी कसे तयार होते हे पाहिले आणि त्याची तीव्रता कमी करण्यासाठी छोटे छोटे घरगुती उपाय ही सुचवले. मला आशा आहे की, आपण या विषयावर गंभीरपणे विचार करून, सुचवलेल्या छोट्या छोट्या उपायांची सुरवात केली असेल. काही प्रकार अजून ही आहेत की ज्यामुळे सफाईद्वारा प्रदुषण/सांडपाणी निर्माण होते ते प्रथम पाहू.

**किटकनाशके फवारणे –**

डास, झुरळे, माशा मारणे यासाठी किटकनाशके फवारावी लागतात आणि अशा प्रकारे १ ग्रॅम प्रतिदिन एका शहरांत वापरली तर २० लाख ग्रॅम रसायनांची उत्पत्ती होते. हे कमी करण्यासाठी काय



करावे तर किटकनाशकांसाठी कांदा, लसूण, पालक, तिखट घरातील किटके नाश करण्यासाठी वापरता येईल तर डासांसाठी नीम तेल, गवती चहा, तेल मिश्रण अंगाला लावल्यास डास पळून जातील. कापूरवडी मॅटच्या जागी लावल्यास डास पळवून लावू शकतो.

**देवपूजा करणे –**



देवपूजा करतेवेळी साधारणतः धूप, कापूर, उदबत्ती यांचा वापर झाल्यास वायू प्रदूषण होते कारण उदबत्तीत धूपामध्ये नायट्रेटस, थॅलटेस्ट, डिझेल, केरोसिनचा वापर केला जातो. यामुळे २ ग्रॅम वापर धरला तर एका दिवशी एका शहरातून ७५ लाख ग्रॅम रसायनांचे प्रदूषण होत असते हे टाळण्यासाठी नैसर्गिक पद्धतीने तयार केलेला धूप, कापूर अखाद्य तेलांचा वापर करून जर वापरला तर हे प्रदूषण थांबवू शकतो.

**व्यसने –**

हे फारच घातक प्रदूषण आहे. रोजच्या रोज पान, गुटका, तंबाखू खाऊन रस्त्यावर पिचकाऱ्या टाकणारे महानुभाव पहातो. त्याप्रमाणे सिगरेट ओढून प्रदूषित धूर टाकणारे अनेकजण आपल्या अवतीभोवती फिरत असतात. जे पान तंबाखू, गुटका आणि सिगरेटचे सेवन करतात, त्यामुळे त्यांचे जीवन उध्वस्त होतेच, पण त्यांच्या बरोबर या व्यक्तिच्या आसपास वावरणारे ही असाध्य रोगाच्या बळी होतात. त्यामुळे वायू प्रदूषण, रोग प्रदूषण हे आणि अशा प्रकारचे प्रदूषणाचे महाभस्मासूर होत असतात आणि म्हणूनच अशा महाभयंकर व्यसनांवर जरब बसावी म्हणून शासन वापरावर बंदी आणते. टीव्ही., रेडिओच्या माध्यमातून यामुळे होणारे दुष्परिणामाबाबत माहिती देत असते त्याकडे सर्वांनीच लक्षपूर्वक आणि गांभिर्याने विचार करणे आवश्यक आहे.



पुणे शहराचीच गोष्ट घेऊ. पुणे शहराला शुद्ध पाणी पुरवठा करण्यासाठी पॉली ॲल्युमिनीयम क्लोराईड व क्लोरिन ही रसायने पाणी पुरवठा विभाग १३,५०,००० /– पॉली ॲल्युमिनीयम क्लोराईड व क्लोरिन ३,७८,०००/– किलो वापरत असते. त्याचप्रमाणे दिवसाला ४०००/– किलो तुरटी पाणी निवळण्यासाठी वापरल्यानंतर आपल्याला स्वच्छ पाणी मिळत असते. परंतु आता पर्यंत दिलेल्या माहिती मधून आपल्या असे नजरेस येईल की आपण या स्वच्छ पाण्याचा वापर दात घासणे, दाढी करणे, स्नान करणे, भांडी घासणे, धुणी धुणे, संडास, बाथरुम सफाई, सौंदर्य प्रसाधने वापरणे या माध्यमातून प्रत्येक माणशी दररोज २० ग्रॅम, रसायने, धातू, तेलजन्य पदार्थ, किटकनाशके फॉस्फेटस् नायट्रेट्रेस कार्बोनेटस् अशी घातक रसायने अंदाजे ६ टन की जी पाण्यांत लवकर विघटीत होऊ शकत नाहीत अशी सांडपाण्यांत लोटतो.

यावर जर आपण वर सुचवलेले उपाय पर्याय म्हणून वापरले तर या सांडपाणी रुपी भस्मासुराशी लढण्यांत आणि सांडपाणी व्यवस्थापनाला आपला हातभार लागेल आणि पर्यायाने पर्यावरणाचे रक्षण तर होईलच आणि सेंद्रिय विघटनास लागणाऱ्या प्रचंड खर्चावरही नियंत्रण बसून तो कमी होण्यास शासनास सहकार्य होईल.

तेव्हां गंभीरपणे हा गहन पण सकृतदर्शनी किरकोळ वाटणाऱ्या विषयावर विचार करा आणि प्रदूषणावर येणारा भार कमी करा ही आग्रहाची विनंती.



**एक ट्रॅफिक सिग्नलवर माणूस भिकाऱ्याला पाहून बोलला,**
**तुला कुठेतरी पाहीलं आहे.......**
**भिकारी हसला आणि म्हणाला,**
**साहेब.... आपण फेसबुकवर फ्रेंड आहोत....**

---

**आपल्या मुलीला माझ्याशी लग्न करण्याची परवानगी द्याल का?'**
**त्या तरुण मुलाने तिच्या वडिलांना विचारलं.**
**काय ड्रिंक वगेरे घेता का? वडिलांनी विचारले?**
**धन्यवाद सर !**
**पण हे लग्नाच ठरल्यानंतर आपण सेलिब्रेट करू हं !**

VIJAY DIWAKAR DHAVLE
MFA

**CONCEPT PRINTS**

**THE DESIGN STUDIO**

AN AESTHETIC ESSENCE TO ADVERTISING

DOMINATION IN

- Pharmaceutical Product Promotional Printed Material, Visual-Aid, Literature, Folder, Brochure
- Packaging
- Conference Printed Material
- Publication

Cell : +91 9225219040 / 9225212384 / 9225852594
Email : vdhavle@rediffmail.com

Tilak Statue, Mahal, Nagpur - 440032

Plot 118, New Dnyaneshwar Nagar,Manewada Road, Nagpur - 440027

**सर्व कऱ्हाडे ब्राह्मण परिवारास हार्दिक शुभेच्छा!**

# निलदिप केटरर्स

सौ. प्रज्ञा प्रकाश काणे

**दूरध्वनी : ०२५१-२४५२०५२**

**भ्रमणध्वनी : ९८१९३१२५६९**

शिवप्रतिमा मित्रमंडळ हॉल
डॉ. कामत हॉस्पिटल शेजारी, ममता
हॉस्पिटलजवळ, निवासी विभाग, एम.
आय. डी. सी., डोंबिवली (पू.)

## पत्रप्रतिसाद

**अविनाश हळबे**

पुणे

मा. संपादक, संपर्क.

सस्नेह नमस्कार!

आपला जुलै-सप्टें १४ चा अंक मिळाला. या अंकात आपण माझी 'त्यांचे महल आता जाणवतंय' ही कविता अत्यंत कलात्मक रीतीने छापली आहे. समर्पक चित्रांचा वापर, आकर्षक छपाई आणि रेखीव लेआउट यामुळे या कवितेची परिणामकारकता निश्चितच वाढली आहे.

आजवर माझ्या कथा-कविता अनेक ठिकाणी छापून आल्या आहेत. परंतु 'संपर्क' इतकी सुबकता त्यात फारच कमी आढळली. याबद्दल आपले व संबंधित कलाकार-सहकारी यांचे अभिनंदन!

आपला

अविनाश हळबे

**शिरीष नवाथे**

॥श्री॥ २९।९।२०१४

संपादक महोदय-

कऱ्हाडे ब्राह्मण संघाचा आजीव सभासद झाल्यावर "संपर्क" हे त्रैमासिक नियमीत वाचनात येऊ लागले.

आपल्या संस्थेच्या कार्याची माहिती संस्थेची प्रगती तर कळतेच पण सभासदांचे लेख व सदरे माहितीपूर्ण व रोचक असतात. या व्यतिरिक्त कऱ्हाडे समाजातील लोकोत्तर कार्याचे मानकरी व सेवाव्रतींची माहिती सुद्धा उद्बोधक असते.

संस्थेच्या कार्यास सुयश चिंतीतो!

आपला स्नेहांकित

शिरीष नवाथे

(पुणे) : Cell: ९९२१६८५१९२

॥श्री॥ सौ शुभदा गुर्जर

२४.९.१४

मा. संपादक

संपर्क,

पुणे.

आपल्या महासंघातर्फे "संपर्क"चे दर ३ महिन्यांनी जे अंक प्रकाशित होतात ते वाचनीय असतात. आणि आपण जाहिरातदारांकडून ज्या जाहिराती मिळवता त्यामुळे संघाच्या अंकाची प्रतिमा उत्तम होत असून उत्पन्नातही भरघोस वाढ होत असणार.


आपणांस हार्दिक शुभेच्छा.

सौ शुभदा गुर्जर

**सौ. शुभदा गुर्जर**

# व्यक्तिपरिचय

# आद्य मराठी कादंबरीकार वेदशास्त्र संपन्न लक्ष्मणशास्त्री मो. हळबे



मराठी भाषा आणि तिचे वाङ्मय समृद्ध करण्याचे कार्य श्रीज्ञानदेवांपासून आजच्या लेखकांपर्यंत अनेक सरस्वती उपासकांनी केले आहे. परंतु त्यात ज्याला मैलाचा दगड (माईलस्टोन) म्हणता येईल असे योगदान देण्याचे कार्य फारच थोड्या साहित्यिकांनी केले. वेद शास्त्र संपन्न लक्ष्मणशास्त्री मो हळबे हे त्यातलेच एक बिनीचे शिलेदार. त्यांचा जन्म सन १८३१ चा आणि मृत्यू १२ मे १९०४ रोजी वाईत झाला. तेथील घर क्र. ५८, गंगापुरी येथे त्यांच्या वाड्यात ते रहात असत. लिखाण आणि काही कामाच्या निमित्ताने ते मुंबईतही वास्तव्य करीत.

ज्या काळात मराठी भाषेत 'कादंबरी' हा प्रकार अस्तित्वातच नव्हता त्या काळात त्यांनी 'मुक्तामाला' ही अद्भुतरम्य कादंबरी वयाच्या फक्त ३०व्या वर्षी म्हणजे सन १८६१ साली लिहून प्रसिद्ध केली जिच्या पुढे १० आवृत्या निघाल्या.

त्यापाठोपाठ विधवाविवाहाला प्रोत्साहन देणारी 'रत्नप्रभा' ही कादंबरीही त्यांनी सन १८६६ साली प्रसिद्ध केली जिच्या तीन आवृत्या निघाल्या. खरेतर वाई सारख्या परंपरा जपणाऱ्या गावात विधवाविवाहासारख्या अत्यंत संवेदनशील विषयावर कादंबरी लिहीणे हे मोठे धाडसच होते. पण आश्चर्याची गोष्ट म्हणजे त्यांचे धाडसी कृत्य वाईकरांनी स्वीकारले. याबरोबरच या लेखनसेवेवर प्रसन्न होऊन, बडोद्याच्या श्रीमंत गायकवाड सरकाराने त्यांना 'शास्त्री' ही पदवी, वर्षासन आणि काही शेतजमीनही दिली होती. या सर्व कार्यामुळे समीक्षकांनी लक्ष्मणशस्स्त्री हळब्यांच्या या कालखंडाला मराठी वाङ्मयाचे 'हळबे युग' असे संबोधले आहे.

याबरोबरच हळबेशास्त्री मुंबई येथून त्याकाळात प्रसिद्ध होणाऱ्या 'इंदुप्रकाश' नावाच्या वर्तमानपत्राचे संपादन करीत असत. 'ज्ञानप्रकाश' नावाच्या मासिकात त्यांच्या कविता प्रसिद्ध होत असत. 'चंद्रिका' नावाचे मासिकही ते स्वत: चालवीत.

सामाजिक बांधिलकीचे महत्व जाणून हळबेशास्त्र्यांनी, १९०३ साली निवासस्थानाजवळील उमामहेश्वर घाटावर, पेशवे कालापासून साजरा होत असलेल्या श्री कृष्णामाई उत्सवात, देवीच्या स्थापनेसाठी एक सिंहासन (दगडी चौथरा) बांधून दिला ज्यावर आजही हा उत्सव संस्थानातर्फे मोठ्या थाटामाटात साजरा होतो. या सिंहासनावर तसा उल्लेखही आहे.

**विधवाविवाहाला प्रोत्साहन देणारी 'रत्नप्रभा' ही कादंबरीही त्यांनी सन १८६६ साली प्रसिद्ध केली जिच्या तीन आवृत्या निघाल्या. खरेतर वाई सारख्या परंपरा जपणाऱ्या गावात विधवाविवाहासारख्या अत्यंत संवेदनशील विषयावर कादंबरी लिहीणे हे मोठे धाडसच होते. पण आश्चर्याची गोष्ट म्हणजे त्यांचे धाडसी कृत्य वाईकरांनी स्वीकारले. याबरोबरच या लेखनसेवेवर प्रसन्न होऊन, बडोद्याच्या श्रीमंत गायकवाड सरकाराने त्यांना 'शास्त्री' ही पदवी, वर्षासन आणि काही शेतजमीनही दिली होती. या सर्व कार्यामुळे समीक्षकांनी लक्ष्मणशस्स्त्री हळब्यांच्या या कालखंडाला मराठी वाङ्मयाचे 'हळबे युग' असे संबोधले आहे.**

यामुळे त्यांची साहित्यविषयक स्मृती चिरंतन असावी आणि भावी पिढ्यांनाही त्यांची आठवण रहावी यासाठी, हळबे कुटुंबियांनी वाईतील लोकमान्य टिळक ग्रंथालयास त्यांची प्रतिमा भेट दिली जिचा अनावरण समारंभ ज्येष्ठ साहित्यिक कै. रविंद्र पिंगे यांच्या शुभहस्ते दि. १५ ऑगस्ट २००१ रोजी वाईत झाला. दि. १२ मे २००४ रोजी शास्त्रीबुवांच्या शताब्दीचे औचित्य साधून महाराष्ट्र साहित्य परिषदेचे तत्कालीन अध्यक्ष आणि थोर साहित्यिक कै. गं. ना. जोगळेकर यांचे 'आद्य मराठी कादंबरीकार कै. लक्ष्मणशास्त्री हळबे आणि त्यांचे कार्य' या विषयावर व्याख्यान वाईच्या वसंत व्याख्यानमालेत आयोजित करण्यात आले. याबरोबरच दि. २४ फेब्रुवारी २०१४ रोजी वाई नगरपरिषदेने त्यांच्या निवासस्थानावरून जाणाऱ्या रस्त्याला ''आद्य मराठी कादंबरीकार लक्ष्मणशास्त्री मो. हळबे मार्ग'' असे नाव दिले.

शास्त्रीबुवांचे पणतू आणि आपल्या महासंघाचे सभासद श्री. अविनाश हळबे, हेही त्यांचा वारसा समर्थपणे चालवत आहेत. त्यांचे आजवर २ कथासंग्रह प्रसिद्ध झाले असून, एकातील 'त्वमेव केवलं कर्ताऽसि' या कथेला महाराष्ट्र साहित्य परिषदेचे 'श्रेष्ठता पारितोषिक' मिळाले तर दुसऱ्यातील 'सोयरा वृक्षवल्लींचा' या कथेचा समावेश महाराष्ट्र शासनाने इ. १२वी 'युवकभारती' या पाठ्यपुस्तकात केला आहे.

महासंघास याचा अभिमान आहे!

**परिशिष्ट :**

**शास्त्रीबुवांच्या कर्तृत्वाबद्दलचे काही उल्लेख व दस्ताऐवजांची माहिती –**

**१. कऱ्हाड येथील अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनवृत्तांत – पृष्ठ ५ आणि २१**

**२. मराठी ग्रंथसूची – संपादक शंकर गणेश दाते – पृष्ठ ७७७.**

**३. श्री. रा. श्री. जोग संपादित मराठी वाङ्मयाचा इतिहास – खंड ५ वा भाग १ – पृष्ठ ४२६ आणि ४२८.**

**४. मराठी कादंबरी – कुसुमावती देशपांडे – पृष्ठ २२ ते २४.**

**५. कोल्हटकरांचा लेखसंग्रह – मराठी कथात्मक वाङ्मय – पृष्ठ ६२३.**

**६. रत्नप्रभा या कादंबरीच्या ३ ऱ्या आवृत्तीतील कै. दत्तो वामन पोतदार यांची प्रस्तावना.**

या सर्व ठिकाणी कै. लक्ष्मणशास्त्री हळबे यांच्या मराठी वाङ्मयातील योगदानावर विस्तृत प्रमाणावर माहिती दिली आहे.

# एक हवंहवसं आऊटींग..

आठवड्याभरातील दगदग मरगळ दूर करण्यासाठी आणि आपल्या कुटुंबातील सर्वांबरोबर क्वालिटी टाईम घालवण्यासाठी मस्त ब्रेक गरजेचा असतो... एक छानसं आऊटींग हवं असतं आणि तेही आवाकातल्या अंतरावर.

सहकुटुंब बाहेर पडताना वाट फुटेल तशी भटकंती करता येत नाही. विशेषत: बच्चे कंपनी आणि आजी आजोबा सोबतीला असताना सर्वांच्या आवडीनिवडीचा विचार करणं आवश्यक असतं तसंच अर्थकारणाचं गणितही सांभाळावं लागतं.

या सर्व गोष्टींचा बारकाईने विचार करुन आम्ही पाचगणीच्या निसर्गरम्य वातावरणात साकारले आहे 'गजानन'. पाचगणी–महाबळेश्वर रोडवर. पाचगणी स्टँडपासून फक्त १० मिनीटाच्या ड्राईव्हवर. इथून खवैयांना पर्वणी असलेले मॅप्रो गार्डन अवघ्या चार किलोमीटरवर आहे आणि महाबळेश्वर जेमतेम १६ किलोमीटरवर. गोंगाटापासून दूर शांत निवांत वातावरणात राहणं आता सहज शक्य आहे.

'गजानन' मध्ये पंधरा लोकांपर्यंत राहण्याची सहज सोय होते आणि एका वेळी एकाच कुटुंबियांना बंगला देत असल्याने आपली प्रायव्हसीही जपली जाते. तेव्हा आता सगळ्या कुटुंबासमवेत एका धमाल आऊटींगचा प्लॅन कराच.

निश्चितच आपले 'गजानन' मधील वास्तव्य संस्मरणीय ठरेल आणि कोणत्याही सीझनमध्ये आपल्याला असं आऊटींग हवंहवसं वाटेल...!!



**सहज सुचलं म्हणून...**

कितीतरी वेळा घराबाहेर पडण्यासाठी आपण सीझनची वाट बघतो. पण असंच एके दिवशी ऑफीसला दांडी मारुन घरातल्या सर्वांसाठी 'सरप्राईज आऊटींग'चा प्लॅन करायला काय हरकत आहे? तेव्हा आता आणखी वाट बघू नका बच्चेकंपनीच्या परीक्षा संपल्या की दीपावलीचा जल्लोष वाढवण्यासाठी आणि प्रसन्न वातावरणात टवटवीत होण्यासाठी पाचगणीला नक्की या!











**इनर्व्हटर बॅकअप असलेल्या आरामदायी निवासाबरोबरच**

- रुचकर जेवणाची उत्तम सोय
- सुंदर झोपाळा असलेले ९०० स्क्वे फूटांचे टेरेस
- बच्चे कंपनीसाठी घसरगुंडी आणि सी सॉ
- मनोरंजनासाठी डिश टीव्ही
- कॅरम खेळण्याची मस्त सोय

**बुकींगसाठी संपर्क: शेजवलकर : 9850710867 | 9326935951 | Email : gajanan.booking@gmail.com**


Nakhye Udyog
लग्न, मुंज, साखरपुडा, सभा, प्रदर्शन, संमेलन व
इतर कार्यक्रमांकरीता सर्व सोयींनी केटरींग सेवेसह
सुसज्ज हॉल
आता वातानूकुलित
शुभमंगल कार्यालय
आणि
एव्हरेस्ट हॉल
शुभमंगल केटरर्स, एव्हरेस्ट शॉपिंग सेंटर लोकमान्य चौक,
फडके रोड, डोंबिवली (पूर्व) - ४२१२०१. फॅक्स : २४८३३५१.
फोन : २४३३१९३, ३०९१९००. संपर्क : योगेश - ९३२३१३३१९१.
एव्हरेस्ट केटरर्स, म. गांधी रोड, डोंबिवली (पश्चिम) - ४२१२०२
फोन : २४९२८६४, ३०९१८९७. फॅक्स : २४८३३५१.
संपर्क : उमेश - ९३२२२८३०३८.

# - बिंदी -

– कै. शं. ना. नवरे

आमच्या इमारतीसमोर भाजीवाले बसतात त्याबद्दल मी कधी सांगितलं आहे का? हे भाजीवाले रस्ता अडवतात, रहदारीला अडथळा करतात. आपल्याला राग येतो, पण त्यांच्या समोरच्या भाज्या पाहून तो राग येता येताच जातो. माझ तरी जातो. कारण ते भाज्या इतक्या कलात्मक तऱ्हेनं लावतात की, डोळ्यांचं पारणं फिटतं. भाज्यांची मांडणी, त्यांची रंगसंगती अतिशय चोखंदळपणे केलेली असते. सगळ्यांनीच. त्यांच्यात बहुतेक स्पर्धाही चाललेली असेल. कुणी सांगावं आणि कुणी विचारावं?



काय झालं? परवा हिनं आमची खोली आवरायला काढली. मला थोडा वेळ मदतीला बोलावलं. आवराआवरीत फोटोंचे जुने अल्बम हाती लागले की, काय गोंधळ होतो तुम्हाला माहीत आहे. आवराआवरी राहते बाजूला आणि फोटो बघताना कुठल्या कुठल्या गोष्टी निघतात.

तर एका अल्बममध्ये आठ–नऊ वर्षांच्या एका मुलीचा फोटो दिसला.

''ही कोण ओळखलीत? हिनं विचारलं. ''ही बिंदी. आपल्या गेटच्या उजव्या हाताला ही भाजी विकायला बसायची आईबरोबर.''

खूप वर्षांनी बिंदीची अचानक आठवण झाली.

एका पंधरा ऑगस्टला किंवा सव्वीस जानेवारीला भाजीच्या एका हाऱ्याकडे माझं लक्ष गेलं.

हाऱ्यात तळाशी हिरव्यागार सिमला मिरच्या गोलाकार लावलेल्या होत्या. त्याच्या वरच्या बाजूला पांढऱ्याशुभ्र काकड्या तशाच गोलाकार लावलेल्या आणि त्यांच्या वरच्या बाजूला मद्रासी शेंदरी गाजरं लावलेली. हाऱ्यात वर्तुळाकार राष्ट्रध्वज दिसत होता. मला कौतुकच कौतुक वाटलं.

हाऱ्याशी बसलेल्या बाईला मी विचारलं, ''ही भाजी कुणी मांडली?''

तिच्या शेजारी आठ–नऊ वर्षांची मुलगी बसली होती. तिच्या डोक्यावरून हात फिरवत ती म्हणाली, ''या बिंदीनं. माझ्या पोरीनं.''

''वा! हुशार आहे!''

मी त्या मुलीकडे पाहिलं.

रंगीबेरंगी घागरा आणि हळदी रंगाची चोळी घातलेली ती सावळी मुलगी चुणचुणीत वाटली. मी कौतुक केल्यावर ती हसली तेव्हां तिचे पांढरेशुभ्र चमकदार दात दिसले. ती फारच आकर्षक भासली.

''ही शाळेत जाते?''

''नाही. माझ्याबरोबर असते.''

मी भाजी निवडली.

बिंदीनं चटकन, भाजी वजन करून माझ्या पिशवीत टाकली. पैसे सांगितले. मी खिशातून पन्नासची नोट काढून तिच्यापुढं केली.

''सुटे द्या ना.''

''तुझ्याकडे नाहीत?''

''आहेत, पण सकाळी सकाळी ते तुम्हांला दिले तर बाकीच्या गिऱ्हाईकांना काय देऊ? तुम्ही मागाहून द्या ना जातायेताना.''

''आणि मी विसरलो तर? तुझी फुकटची भाजी पचायची नाही मला.''

बिंदी छानपैकी हसली.

मनात आलं, कुठल्याही टूथपेस्टच्या जाहिरातीत ही शोभून दिसेल.

''काका, मी ओळखते तुम्हांला. ''बिंदी म्हणाली. ''इथंच दुसऱ्या माळ्यावर तुम्ही राहता ना? भाजी नाही पचली तर मी तुमच्याकडे येईन पैसे मागायला.'' ''पैसे मागायला?''

''नाही, नाही. तुमचं घर पहायला.''

ही बिंदीची अशी पहिली ओळख झाली.

पहिल्यांदा ती आमच्याकडे आली ती एक किलो मटार घेऊन. दारातच उभी राहिली.

'काका, बाजारात पहिला वाटाणा आलाय. तो घेऊन आलेय तुमच्यासाठी .. आत येऊ?''

''ये ना.''

मी बायकोला हाक मारली. ती बाहेर आल्यावर म्हटलं,

''तुला म्हणत होतो, ती ही बिंदी.''

''मी काकींना ओळखते.'' बिंदी म्हणाली, ''त्या कधी कधी आमच्याकडून घेतात भाजी.''

''तू मुद्दाम एवढा मटार घेऊन......''

'' मल तुमचं घर बघायचं होतं म्हणून आलेय. चालेल ना?''

''अगदी''.


# VIDISHA
## ENTERPRISES

Tally Partner

**We provide all Services for Tally Accounting Software**

21/272, Yamunanagar,
Nigdi, Pune - 411 044

**Mob.** : +91-9970156307
**Tel.** : +91-20-27660748
**Email** : meghanathakur@yahoo.com

तिनं सगळीकडे नजर फिरवली.

''एवढ्या जागेत तुम्ही राहता? आमची एवढीच जागा आहे.''

तिनं दोन हातांनी आपल्या जागेचा अंदाज देण्याचा प्रयत्न केला.

''आम्ही सात माणसं राहतो तिथं. आम्ही तीन बहिणी, दोन भाऊ, आई आणि बाप्पा. मोठ्या दोन बहिणींची लग्न झाली आहेत म्हणून पुरते जागा.''

''तुम्ही सात मुलं?''

''आमच्या वाघरी लोकांत असंच असतं. माझी मोठी बहीण सोळा वर्षांची आहे. तिला दोन मुलं आहेत. बाराव्या वर्षी लग्न झालं तिचं.''

''म्हणजे आणखी चारपाच वर्षांनी तुझंसुद्धा.''


''मी लग्नच करणार नाही. कशाला करायचं? रोज मार खायला?''

ती मोठ्या बाईसारखी गंभीर झाली.

''तू शाळेत का जात नाहीस?''

''आमच्यात कुणीच जात नाहीत. मुलं जात नाहीत, मुली जात नाहीत...

मला आवडेल शाळेत जायला, पण कोण पाठवणार? आणि धंद्यावर आईच्या मदतीला कोण? आमच्यासमोर माझी एक मैत्रीण राहते. तुमच्यापैकीच आहे. तुमच्यासारखंच



छान घर आहे तिचं. पण खूप लहान. एवढं मोठं नाही. तिला एकच भाऊ. मग घरात गर्दी नाही. मला गर्दीचं घर नाही आवडत.''

''नाव काय तुझ्या मैत्रिणीचं?''

''मीना.. .. ती जाते शाळेत. छान छान कपडे घालून. ती कधी कधी मला शाळेच्या गोष्टी सांगते. मग रडू येतं मला.''

''कां?''

''मी शाळेत जात नाही म्हणून. मी फुकट वाघरी झाले.. नाही तर छान घर, गर्दी नाही घरात... रोज शाळेत जायचं.''

बिंदीचे डोळे लकाकू लागले.

''काका, एक कागद देता छोटासा? आणि पेन्सिल? मी गंमत दाखवते.'' मी तिला कागद, पेन दिलं.

ती खाली बसली. जमिनीवर कागद ठेवून तिनं पटकन इंग्रजीत आपलं नाव लिहीलं. बी–आय्–एन्– डी– आय्.

मीनानं शिकवलं मला.... काका, मी बरोबर लिहीलंय् ना... ? '' कधी कधी मी चुकून ''बी'' उलटा काढते. म्हणजे आधी गोळे काढते आणि मग लाईन.... बास एवढंच शिकलेय् मी आणि शिकले म्हणजे...''

बिंदीनं आपले दोन्ही पंजे आमच्या समोर धरले.

आम्हाला काही कळलं नाही.

''नखं बघा ना माझी. किती स्वच्छ आहेत. मीना शिकवते ना मला? रोज आंघोळ करायची. स्वच्छ कपडे घालायचे.. केस विंचरायचे... दात घासायचे... नखं कापायचे... तिनं मला रंगोलीपण शिकवलीय. मीना सांगते ते मी सगळं करते.''

''म्हणजे?''

''मी खोटं बोलत नाही. लबाडी, चोरी करीत नाही. सगळ्यांशी नीट बोलते. बाजारची शेव, गाठी खात नाही... शाळेत गेले असते मी, तर... तर सगळं मिळालं असतं मला. मी स्वत: कमावलं असतं. लहान पण छान घर... चांगलं राहणं.... रोज पेपर, पुस्तक वाचणं... मी मग गाणीपण म्हटली असती... वाघरी नसते राह्यली, रस्त्यावर भाजी नसती विकली....तुमच्या लोकांसारखी झाले असते.....''

'' तू हे बोलायला कुठं शिकलीस?''

''मीना अशीच बोलते ना? ऐकून ऐकून मी तसं बोलते.''

''चहा घेशील बिंदी''? तिनं विचारलं.

''नक्षीच्या कपात द्याल''? नक्षीच्या कपात मी चहा घेतलाच नाही कधी.

शिकले नाही म्हणून काहीच मिळालं नाही मला.

काळजात सल आली.

नक्षीच्या कपातला चहा ती नक्षीकडे बघत बघत पंधरा मिनीटं पीत राहिली.

निघताना हसत हसत म्हणाली. ''थॅंक्यू.''

''मीनानं शिकवलंय् ना?''

ती मनापासून हसली तिचे सुंदर दात चमकले.

नातीच्या वाढदिवसाला हिनं आवर्जून


इन्शुरन्स स्पेशालिस्ट
आपले भवितव्य सुरक्षित करा

सर्व प्रकारच्या विमा योजना
एकाच ठिकाणी उपलब्ध.

- जीवन विमा
- मालमत्ता (प्रॉपर्टी) विमा
- आरोग्य विमा (मेडिक्लेम)
- संस्थेचा विमा (कॉर्पोरेट विमा)
- वाहन विमा
- सागरी (मरिन) विमा
- अपघात विमा
- सामुदायिक विमा (ग्रुप इन्शुरन्स)
- प्रवासी विमा
- अनिवासी भारतीय विमा

संपर्क : मंगेश जांभेकर
मोबाईल : ९८१९७ ५०९५५

Email : mangesh.jambhekar@gmail.com
Website : www.insurancespecialist.in

कार्यालयाचा पत्ता : १०३/ बी-२, जम्बो दर्शन सोसायटी, कोलडोंगरी रोड नं.२, अंधेरी (पुर्व), मुंबई - ४०० ०६९.

बिंदीला आमंत्रण दिलं.

बिंदी सुंदर पोशाख करून आली. आरसे लावलेला हिरवागार घागरा, पाठीवर नाड्यांनी बांधलेला आरसे लावलेला केशरी पोलका आणि खांद्यावरून घेतलेली पोपटी रंगाची ओढणी तिला शोभत होती. तिनं केसांच्या घट्ट आणि जाड वेणीवर मोगऱ्याचा गजरा माळला होता.

सर्व मुलींत ती उठून दिसत होती.

नातीला तिनं गुलाबाचा एक गुच्छ दिला आणि हलकेच तिचा पापा घेतला.

मुलानं समारंभाचे फोटो काढले.

कार्यक्रम संपला तरी बिंदी घोटाळत होती.

मग ती माझ्याजवळ आली आणि म्हणाली, ''काका, माझा एकटीचा एक फोटो घ्यायला सांगाल त्याला..? माझा फोटो कधी निघालाच नाहीये.''

मी मुलाला तिचा फोटो काढायला सांगितलं.

बिंदीचा चेहरा फुलून आला.

''तुझा कुठं फोटो काढायचा''? मुलानं तिला विचारलं.

तिनं हॉलमध्ये नजर फिरवली.

लाकडी आरामखुर्चीकडे बोट दाखवत ती म्हणाली,

''त्या खुर्चीवर बसले तर चालेल?''

''बेलाशक.''

''काका, मी एकदाच खुर्चीवर बसलेय् माझ्या मैत्रिणीच्या घरी..

ती खुर्चीपण साधी होती, अशी भारी नव्हती.''

''तू आरामात तुला हवी तशी बस''.

बिंदीनं डोक्यावरून ओढणी घेतली. ती नीट बसवली. मग ती खुर्चीवर बसली. खुर्चीच्या हातावर तिनं कोपर टेकलं, तळहातावर हनुवटी ठेवली. विचारलं, ''फोटो काढताना हसायचं असतं ना?''

आम्ही हसलो तशी तीही हसली.

फोटो निघाला.

''हा फोटो केव्हां मिळेल?''

''दोन एक दिवसांनी''.

''मला तो सगळ्यांना दाखवायचा आहे. आधी मीनाला''. ''दोन दिवसांनी ती फोटो न्यायला आली. फोटो बघून ती लाज लाज लाजली आणि फोटो घेऊन धावत सुटली.

आठ–दहा वर्षांपूर्वीच्या त्या फोटोची प्रत माझ्या अल्बममध्ये दिसली. बिंदीच्या आठवणी जाग्या झाल्या.

गेली काही वर्ष बिंदीच्या आईच्या जागी असाच कुणी तरी भाजीवाला बसलेला असतो. बिंदीची आई कुठं गेली, बिंदी कुठं गेली कुणालाच माहीत नाही.

आज कुठं असेल तरुण, सुंदर बिंदी? की लग्न होऊन दोन–चार मुलांची आई झालेली असेल ती? कुठं कशी रहात असेल...

अशा कितीतरी बिंदी असतील.

शिक्षणाच्या अभावी स्वप्नांची, गुणांची राख झालेल्या.

# लोहगड ....मोहीम फत्ते!!

कऱ्हाडे ब्राह्मण संघ, मुलुंड, च्या ज्येष्ठ सदस्यांनी प्रोत्साहन देऊन युवा संघटनेला विविध उपक्रम राबवण्याचा तगादा लावला आणि विविध बैठकांमधून गिर्यारोहणाचा कार्यक्रम आखला गेला.

पूर्वतयारीसाठी सर्वांनी एकत्र येऊन कामांची विभागणी केली. बहुसंख्य सभासदांची गिर्यारोहणाची ही पहिलीच वेळ असल्याने निरनिराळ्या सूचना दिल्या गेल्या. (एकूण १३ जण)

२४ ऑगस्टला भल्या पहाटे ६.३० वाजता (सर्वजण ठाणे स्टेशनवर एकत्र आले. अधिवक्ता श्री. चेतन बारासकर हे आमचे मार्गदर्शकही आले. त्यांची सर्वांशी ओळख करून झाल्यानंतर ट्रेनमध्ये गप्पागोष्टींना ऊत आला. त्यातच ठेपले आणि काकड्या यांचा भरपेट अल्पोपहार करून सर्वजण लोणावळा स्थानकावर उतरले.

लोणावळ्याला रत्नागिरीहून आणखी ३ जण सामील झाले. तिथून लोकलने आम्ही त्वरीत मळवली गाठले. मळवलीला अमृततुल्य प्राशन करून आम्ही लोहदुर्गाकडे प्रयाण केले. वाटेत आणखी दोन जण पुण्याहून येऊन मिळाले आणि आमची एकूण संख्या १८ झाली.

चेतन बारासकर यांच्याबरोबर सर्वात पुढे होते दोन शिलेदार – कु. मिताली जावडेकर (वय १२ वर्षे) आणि चि. निरंजन करकरे (वय ८ वर्षे). गडाच्या पायथ्यापर्यंत पक्का रस्ता उपलब्ध असूनही सर्वांनी एकमुखाने कठिण मार्ग निवडला. आमचा मार्गदर्शक सर्वांना पावला–पावलावर प्रोत्साहन देत होता आणि ''आता आपण पोचलोच'' असं म्हणून धीरही देत होता. वाटेत कोणीही बसायचे नाही, ''थांबला तो संपला'' हे सूत्र धरून आम्ही चालत राहिलो. वाटेत एके स्थळी लिंबू सरबत मिळाले ते अक्षरशः ''अमृताहूनी गोड'' वाटले.

पावलाला पाऊल जोडत आम्ही गडावर पोहोचलो. थोड्या वेळात गडाच्या सर्व बाजूंनी पाहणी करून आम्ही विंचू कड्याजवळ पोहोचलो. विंचू कड्याचे दृश्य बघूनच आम्ही छत्रपती शिवरायांच्या मावळ्यांना मनोमन मुजरा केला. एका अत्यंत निमुळत्या वाटेने जीव मुठीत धरून (शेजारीच दरी होती) आम्ही विंचू कडाही कडाही सर केला.

थोडा पाऊसही पडल्याने वातावरणही एकदम आल्हाददायक झाले होते. पावलं परत यायला तयारच नव्हती. परंतु परतीची गाडी आमची वाट बघत होती. आम्ही गडाच्या पायथ्याशी येऊन मस्त झुणका–भाकरीचा आस्वाद घेतला.

लोणावळ्याला परत येऊन गाडीने आम्ही सर्वजण पहिल्या वहिल्या गिर्यारोहणाच्या सुखद स्मृती घेऊन परतलो. आता नियमीत सर्वांनी एकत्र येऊन अशा भ्रमंतीच्या सहली काढण्याचे ठरविले.

लोहदुर्ग मोहीम फत्ते झाली आता मोहीम.......

**प्रसाद करकरे, कऱ्हाडे ब्राह्मण युवा संघ**
**सदस्य मुलुंड–मुंबई, मो. ९८६७६१९१५३**
karkare. Prasad@gmail.com

## वधू-वर माहिती



**१) तुषार दिवाकर लघाटे- पुणे**

जन्म १६-१२-१९७८, उंची ५'-३'' कऱ्हाडे, शिक्षण इलेक्ट्रीक कम्युनिकेशन, तूळ रास, कुत्स गोत्र, राक्षस गण, विशाखा नक्षत्र, रक्तगट A+ve अपेक्षा पोस्ट ग्रॅज्युएट, गोरी, देखणी, उंची ५'-१''

**२) चेतन प्रकाश ढवळे -पुणे**

जन्म १-१२-१९७९, उंची ५'-८'' कऱ्हाडे शिक्षण बी ई इलेक्ट्रीकल, मेष रास, वशिष्ठ गोत्र, देवगण, A+ve अश्विनी, चरण २ नक्षत्र, अपेक्षा - उच्चशिक्षित, देखणी, नोकरीस प्राधान्य, उंची कमीत कमी ५'-६'' हवी.

**३) शंतनू विण्णू ठेकेदार - पुणे**

जन्म २८-१०-७९, उंची ५'-८'' कऱ्हाडे, बी कॉम एम बी ए, मकर रास, गार्ग्य गोत्र मनुष्य गण उत्तराषाढा नक्षत्र B+ve स्वत:चा व्यवसाय टूरस् अ‍ॅण्ड ट्रॅव्हलर्स, उत्पन्न २५००० द.म., अपेक्षा - पदवीधर व नोकरी करणारी उंची ५'-६'' पर्यंत असावी. गोरी.

**४) कपिल विजय रायकर - पुणे**

जन्म २५.७.१९७९ उंची १५३ से.मी. कऱ्हाडे बी ई इलेक्ट्रीकल डीबीएम, नोकरी हैद्राबाद येथे झायलिंक कंपनी उत्पन्न वार्षिक २२ लाख, कर्क रास, वसिष्ठ गोत्र राक्षस गण, आश्लेषा नक्षत्र रक्तगट B+ve अपेक्षा - अनुरूप.

**५) दुर्वेश अरविंद मोघे - पुणे**

जन्म-१७.५.१९७९ उंची ५'-७'' कऱ्हाडे ब्राह्मण शिक्षण डबल एम.बी.ए., एम.पी.ए., पी एच डी, नोकरी विमाननगर येथील कंपनी. मासिक प्राप्ती ५००००/- घटस्फोटीत आहे. मकर रास, मुद्गल गोत्र, देवगण, श्रवण नक्षत्र, रक्तगट o+ve



**६) सुधन्वा धनेशचंद्र देव - पुणे**

जन्म - १३.५.७९, उंची १६० से.मी. कऱ्हाडे, बी.कॉम, नोकरी आहे पगार रु. १६०००/- वृश्चिक रास, कौशिक गोत्र देवगण, अनुराधा नक्षत्र रक्तगट AB+ve अपेक्षा अनुरुप असावी.

वर पाहिजे -

**१) कु. पूर्वा विजय तांबे - पुणे**

जन्म १९.१०.७९ उंची ५-४'', कऱ्हाडे शिक्षण बॅचलर ऑफ फिजीओथेरपी कन्या रास गार्ग्य गोत्र, देवगण, रक्तगट o+ve हस्त नक्षत्र. अपेक्षा - उच्चशिक्षित, मनमिळावू, इंजिनिअर, डॉक्टर यांना प्राधान्य.

**२) कु. प्रतिमा प्रभाकर शेवडे - पुणे**

जन्म २५.९.७९ उंची ५-४'' कऱ्हाडे शिक्षण बी. ए. इंग्लिश लिटरेचर, M.C.V.C. in Cooking Cookery. वृश्चिक रास, अत्रि गोत्र, मनुष्य गण, अनुराधा नक्षत्र, रक्तगट b+ve अपेक्षा पुण्यातील हवा, स्वत:चे घर हवे, चांगली नोकरी हवी.

**३) कु. मेघना मोहन सुभेदार- पुणे**

जन्म - १६.१२.७८ उंची १५० सें.मी. कऱ्हाडे ब्राह्मण, कम्प्युटर इंजिनियर, नोकरी आहे. मिथुन रास, जमदग्नी गोत्र, मनुष्य गण, मृग नक्षत्र, A RH+ve. अपेक्षा - डॉक्टर, इंजिनिअर, सरकारी अधिकारी, मनमिळावू.

**४) कु.शीतल विनायक गोठोस्कर- पुणे**

जन्म - २१.८.१९७८, उंचे १६३ सें. मी. कऱ्हाडे, सी.ए. - मीन रास, भारद्वाज गोत्र, देवगण, रेवती नक्षत्र, o+ve

**५) कु. अर्चना भालचंद्र देवस्थळी - पुणे**

जन्म १०.७.७८ उंची ५'.३'' कऱ्हाडे, शिक्षण बी. ए. संगीत एम.ए. सोशिऑलॉजी, सिंह रास, अत्रि गोत्र, मनुष्यगण पूर्वा नक्षत्र. नोकरी नाही. अपेक्षा - पदवीधर, सुसंस्कृत, सुशिक्षित, सॉफ्टवेअर क्षेत्रातील असावा.

**कृपया ईमेल अथवा फोनद्वारे कऱ्हाडे ब्राह्मण महासंघ, पुणे यांच्याशी संपर्क साधावा.**


# सातारी पेढा शॉप



संस्थापक
कै. वासुदेव महादेव जावडेकर

स्थापना-१९३६



मशहूर
सातारी पेढे
काजू बर्फी
आंबा बर्फी
गुलकंद बर्फी
श्रीखंड वडी

चटकदार
फरसाण
स्पेशल चिवडा
सुकामेवा
खारा काजू
चटणी वगैरे

श्रीखंड आणि चक्का
पौष्टीक खाद्य भांडार
अभ्यंकर रोड, सीताबर्डी, नागपूर-440012, फोन : 0712-2525704

# कॅमेऱ्याच्या कोनातून

विवेक नारळकर, पुणे
मो. ९८५०८२८२२४
naralkar.vivek@gmail.com



गेल्या २५-३० वर्षात मी जाहिरात क्षेत्रातच असल्यामुळे व्यवसाय म्हणून व खूपदा छंद म्हणून माझी फोटोग्राफी सुरू असते. कधी लेह-लडाखचा दुर्गम भाग आमच्या कॅमेऱ्यात पकडण्याचा प्रयत्न करतो. नुकतेच मार्च मध्ये उत्तर भारतात जाऊन आलो. उत्तर भारतात होळी बद्दल खूप आकर्षण मला होते. त्यामुळे वाराणशी, अलाहाबाद सारनाथ.

एक प्रवासी म्हणून, एक छायाचित्रकार म्हणून उत्तर भारतातले विविध रंग, रुढी आणि परंपरा बघणे आणि ते कॅमेऱ्यात बंदिस्त करणे खूप आनंददायी झाले. एक तर तिथल्या हिंदी भाषेत बोलण्यासाठी पहिले १-२ दिवस आम्हांला जडच गेले. आमचे 'बम्बैया' हिंदी आटोपते घ्यावे लागले. त्याच्या बोलण्यातला लहेजा फार आवडला. वाराणसीमध्ये वहाणारी नदी म्हणजे अथांग वाटली. सोबत आणलेली समृद्ध अशी माती दोनही किनाऱ्यांवर पसरलेली असते. महाराष्ट्रातील जनतेपेक्षा उत्तर भारतीय अधिक धार्मिक वाटत होते. जागोजागी देवळे, साधू, मठ, आणि धार्मिकतेचे वातावरण रस्त्यावरून गाई, वासरे जणू 'सब भूमी गोपालकी' असल्यासारखे शांतपणे वावरत होते. अगदी घाटांवरच्या उंच पायऱ्या , चबुतरेही त्यांनी व्यापलेले होते. गंगा नदीवरील पूल मात्र खूप मोठे व प्रशस्त वाटले. कुंभमेळ्या दरम्यान होणाऱ्या अफाट जनसागरासाठी तात्पुरते अनेक पूल व स्नानासाठी व राहुट्यांसाठी सोयी केलेल्या असतात असे समजले. किनाऱ्यावरील मारुती मंदिर तिथे 'लेटे हुए हनुमानजी' नावाने प्रसिद्ध आहे. सुमारे १५-१७ फुटी असलेली मूर्ती जमिनीवर आडवी आहे. 'राम-रावण युद्धानंतर हनुमानाने प्रभू रामचंद्राची परवानगी घेऊन येथे विश्रांती घेतली अशी श्रद्धा तेथील भाविकांमध्ये आढळली.

वाराणसीच्या उपनगरात 'चक' छतगड रोड येथे केंद्राची 'हरिश्चंद्र रिसर्च इन्स्टिट्यूट ही अप्रतिम संस्था एका मित्रामुळे बघण्याची संधी मिळाली. नदीच्या किनारी, जंगलाला लागून असलेला या संस्थेचा परिसर आय. आय.टी. सारख्या इन्स्टिट्यूट प्रमाणे वाटला. निसर्गरम्य खूप शांतता व पक्षी व मोर यांच्या सहवासात डॉक्टरेट मिळविणारे भारतातले विद्यार्थी भाग्यवानच म्हटले पाहिजेत.

वाराणसीमध्ये अगदी गर्दीच्या भागांमधून आम्ही फिरलो. दारगंज भागात जुन्या हवेल्यांचे आम्हांला मिळालेले फोटो अप्रतिम असेच होते. पुढे नदी काठावर असलेले श्री नागवासुकिचे मंदिर हे मराठे शैलीतील बांधकाम असलेले आढळले.


अलाहाबाद तर गंगा-यमुना या दोन नद्यांच्या संगमामुळे जवळपास वर्षभर गजबजलेले शहर आहे. नेहरु, शास्त्रीजी अशा पंतप्रधानांची गावे म्हणून आम्हांलाही वेगळी उस्तुकता होती. होळीचा माहोल मात्र २-३ दिवसांपासून दिसत होत. रस्त्याच्या जवळपास मध्यभागी लाकडे व काही वेळा हिरवी पाने असलेल्या लहान-मोठ्या फांद्या मांडून ठेवलेला दिसे.



त्यावर देवीच्या चेहऱ्यांचे मुखवटे, चकमकीत हार घातलेले आढळत. आमचे हॉटेल ठरवूनच घाटाजवळ निवडले. अस्सी घाटापासून पुढे पुढे नदीवर वेगवेगळ्या काळात व वेगवेगळ्या शैलीत बांधलेले घाट आहेत. उदा. रीवा घाट, जानकी घाट, पंचकोट घाट, शिवाला घाट, राजा घाटावर महाराष्ट्राचा व पेशव्यांचा ठसा



दिसतो व उल्लेखही सापडतात. यात्रेकरू व पर्यटकांना आकर्षण घेणारा घाट म्हणजे दशाश्वमेध घाट होय. कारण रोज सायंकाळी इथली होणारी गंगेची आरती खूप प्रसिद्ध आहे. हा सोहळा सुमारे एक तास चालतो. लहान-मोठे, स्त्री-पुरुष, धार्मिकतेने व पर्यटनासाठी आलेले परदेशी माणसे इथे रमून जातात. केशरी वस्त्र घातलेले तरुण पुजारी आणि हातातील मोठ्या व पेटत्या समयांनी केलेली गंगेची आरती विलोभनीय वाटते. माईकवरून बोटींमधून शेकडो लोक कॅमेऱ्यात



चित्रबद्ध करीत असतात. संपूर्ण कार्यक्रम महिला व पुरुष पोलिसांच्या देखरेखीखालीच होत असतो.

आमिर खुसरो बाग छायाचित्रणासाठी फारच उत्तम आहे. एकूण ४ कबरी व त्यावरील इमारती म्हणजे लाल पिवळ्या दगडांवरील मुघल काळातल्या कोरीव कामांचा उत्कृष्ठ नमुना आहे. १६व्या शतकाच्या सुरवातीस जहाँगिराने बांधलेल्या ४ कबरी या आमिर खुसरो त्याची पत्नी तमोलन, आई व बहिण यांच्या आहेत. नेहरु घराण्याचे 'आनन्द भवन' वास्तुकलेचा उत्कृष्ठ नमुना आहे. केंद्रातून अफाट निधी तिथे मिळत होता त्यामुळे त्याची देखभाल ही उत्तम अशी आहे. एक गजबजलेले पर्यटन स्थळ असे त्याचे स्वरुप वाटले. त्या उलट रामनगर या गावात तेथील महाराजांचा राजवाडा व त्याठिकाणी सध्या असलेले वस्तू संग्रहालय बघायला गेलो, तेव्हां समजले की माजी पंतप्रधान लालबहाद्दूर शास्त्री यांचे हे जन्मगाव व वडिलोपार्जित घर स्मारक म्हणून केले आहे अशी पाटी ही बँकेने त्यांची जाहिरात वजा केली होती. आम्ही दोघे चालत त्या घरांमधून शोधत गेलो. वाटेत विचारत शेवटी पोहोचलो तर आनंद भवनाच्या उलटा अनुभव. घर साधेच होते. पण त्यालाही कुलूप आणि कोणी पहारेकरीचा वा माहिति सांगणार अस्तित्वात नव्हता. लहानशी पाटी केविलवाणी वाटली.

पहा पान ३१ वर....

# पाककृती

## तांदुळाशिवाय ढोकळा/इडली/डोसा

### मिश्र डाळींचा ढोकळा

**साहित्य –** मूगडाळ १/२ वाटी, मसूर डाळ १/२ वाटी, चणाडाळ २ चमचे, उडीदडाळ २ चमचे, ईनोचे ५ ग्रॅमचे १ पाकीट. हिरवा मसाला (हिरवी मिरची, आले लसूण कोथिंबीर), खोबरे किसलेले, कढीलिंब, १/३ लिंबू, फोडणीसाठी तेल मोहरी, हिंग, तीळ, मीठ व साखर चवीनुसार.



**कृती –** सर्व डाळी एकत्र करून ६ ते ७ तास भिजत ठेवाव्या. २ हिरव्या मिरच्या अर्धा इंच आले. ७ ते ८ लसूण पाकळ्या घ्याव्यात व भिजलेल्या डाळी मिक्सर मधून काढाव्यात. थोडे पाणी घाला. कुकरमध्ये पाणी घेऊन कुकर गरम करण्यास ठेवावा. मोठ्या कुकरच्या डब्याला आतून तेलाचा हात लावावा. मिक्सर मधून वाटलेल्या पिठात अर्धे लिंबू आणि ईनो पूर्ण घालून चवीनुसार साखर मीठ घेऊन ते फेसावे. तेलाचा हात लावलेल्या डब्यामध्ये हे मिश्रण १५ मिनीटे वाफवावे. (प्रेशर कुकरची शिट्टी काढून ठेवावी) थोड्या वेळाने वाफवलेले मिश्रण गार झाल्यावर, फोडणी करून घ्यावी. या फोडणीमध्ये ४ चमचे पाणी घालून ते ढोकळ्याचे मिश्रणावर पसरावी तयार ढोकळा कापून डिशमध्ये काढावा. कोथिंबीर, ओले खोबरे घालून सुशोभित करावा आणि सर्व्ह करावा.

**टीप –** १ वाटीच्या डाळीचा ढोकळा ४ व्यक्तिंना पुरतो व यातून २५ ग्रॅम प्रथिने मिळतात. मूग, मसूर डाळ आवडीप्रमाणे कमी जास्त घ्यावी.

## तांदुळाशिवाय इडली



**साहित्य –** १ वाटी उडीद डाळ, १ वाटी मूग डाळ, खाण्याचा सोडा अर्धा चमचा, २ चमचे तेल व मीठ चवीनुसार.

**कृती –** सर्व डाळी ७-८ तास भिजत ठेवा. त्यानंत्रा त्या डाळी मिक्सर मधून वाटून ५-६ तास फुगण्यास ठेवाव्यात. इडली पात्रात योग्य प्रमाणांत पाणी घेऊन ते उकळण्यास ठेवावे. इडली पात्रास तेलाचा हात लावून घेऊन फुगलेल्या पिठात चवीनुसार मीठ व सोडा घालून १५ मिनीटापर्यंत उकडण्यात ठेवावे. इडल्या अगदी हलक्या होतात. यामधून ४८ ते ५० प्रथिने मिळतात.


।।श्री।।

स्थापना : गणेश चतुर्थी १९९३

सर्व कऱ्हाडे ब्राह्मण परिवारास हार्दिक शुभेच्छा

प्रकाश जठार यांचे

**ज्योती एन्टरप्रायझेस**

(निवडलेला किराणा माल, सर्व प्रकारचे मसाले व सुका मेवा होलसेल व रिटेल भावात मिळण्याचे एकमेव ठिकाण)

पत्ता – गाळा नंबर २, गिरीश अपा., गोपाळ नक्षर, गल्ली नंबर २, डोंबिवली (पूर्व) पिन – ४२१२०१,

फोन–०२५१२४४१२१२, भ्रमणध्वनी – ९८१९२५१४१२

# With Best Compliments from

# PRAKASH HOME INDUSTRIES

PHI SINCE 1960

**An ISO 9001 : 2008 Certified Company**


PHI the manufacturers of small machine tools, started its activity in small workshop in the year 1960 in Belgaum City. Initially it started producing Hand Operated Punching Machines, Hand Presses and Sheet metal components. In the year 1976 it shifted its factory in modern building in Udyambag, Belgaum for better production. Now PHI is manufacturing small machine tools-Radial and Pill Drilling Machines, Centre Lathes, Vertical Spindle Surface Grinders, Tool and Cutter Grinder, Filing Machine. All machines are designed and manufactured indigeneously. Machine tools are produced with good quality of Raw Materials, rigorous quality control and skilled workmanship. PHI is known for producing Finest Quality of machine tools in small sector, for Reliability and prompt after sales service.

**Address**

R. S. No. 695-C, Near Rani Channamma Nagar, IInd Stage, Udyambag, BELGAUM - 590 008. (INDIA) Phone: +91 - 831 - 2441626,2442390 Fax: +91 o 831 - 2445026 Mobile: 09448395664 E-mail: phibgm@gmail.com

**Manufacturers of :** Machine Tools, Radial Drilling Machines, Surface Grinders, Filing Machines, Tool & Cutter Grinders etc.

**Sheet Metal Parts :** Air Cleaner Housing, Pre cleaners, Silencers, Tanks, Hoods, Pipe Bends etc.




DRILLING MACHINE
Model - PRD - 7 / PRD -10

Fabricated Parts
Manifold Exhaust, Silencers, Pipe bends, Air Cleaner Assembly etc..



**MANUFACTURE OF MILD STEEL SHEET METAL PRESSED COMPONENTS & ASSEMBLIES LIKE...**

- Exhaust Manifolds
- Various size elbows, bend pipes for Air, Water, oil circulation
- Housings for Air Cleaner Filters.
- Exhaust Connections
- Fuel Tanks
- Brackets, clamping rings, covers etc.
- Exhaust Silencers.



(VERTICAL SPINDLE SW VELLING HEAD ROTARY TABLE)
SURFACE GRINDER
Model - ACCUGRIND 300 /400 /450

OKUMA HMC
MA-600 HB



HAAS TURNING CENTRE



HAAS VMC
VF3YT



**Machining of :** Heavy Cast Iron & Steel Components on Turning Center VMC, HMC & Conventional Set up

**MACHINERY AT PHI**

- HMC (Okuma) 1000mm X1000mm X 950mm (Twin Pallet) Spindle HSK 100
- HMC (Mitsui Seiki) 800mm X 800mm X 750mm (Twin Pallet)
- VMC (Haas) 1016mm X 660mm X 635mm
- Turning Centre (Haas) Turning dia 530 swing 800
- Balancing Machine (300 dia max weight 50kg) Conventional setup (Lathe, drilling, milling, VTL machine, horizontal grinding, cylindrical grinding etc.)

**MEASURING INSTRUMENTS/ TESTING EQUIPMENTS**

- Trimos-1 meter accuracy 1 micron
- Surface Roughness Tester
- Granite Surface Plate (size 1800mm x 1200mm x 200 mm)
- External facility for CMM (3000mm X 1500mm) at B.F.C
- Other measuring instruments like micro meter, vernier caliper, vernier height guage, bore dial guage etc.

# मॅट्रीक्स थेरपी - २१ व्या शतकातील औषधोपचार

वैज्ञानिक प्रगतीमुळे आजकाल नवनवीन उपचारपद्धती येत आहेत. या विज्ञानामुळे २१व्या शतकात वेदनेवर मात करणे शक्य झाले आहे. आजकालच्या बदलत्या जीवनशैलीमुळे मान, पाठ, कंबरदुखी, गुडघेदुखी यांचे प्रमाण वयाच्या ३५–४० वर्षांच्या लोकांमध्ये वाढले आहे. या सर्वांची कारणे म्हणजे कामाच्या अनियमित वेळा, अपुरा व्यायाम, नियमित व सकस आहाराचा अभाव, बैठी जीवन पद्धती, शारीरिक व मानसिक ताणतणाव, चुकीची शारीरिक स्थिती (posture) ही आहेत.

या वेदनांचे मूळ कारण काय? हा प्रश्न आजही महत्त्वाचा आहे. हाच प्रश्न जर्मनीच्या डॉ. रंडोल या सर्जनना पडला. त्यांनी या प्रश्नाच्या मूळाशी जाण्याचा विचार केला. याचा शरीराच्या बाबतीत मूळ म्हणजे पेशी, पेशींची रचना व पेशींचे कार्य अभ्यास त्यांनी video microscope खाली करायला सुरवात केली. त्यात त्यांना अनेक नवीन गोष्टी दिसून आल्या. आपल्या शरीरात ७२% पाणी आहे व त्यात असंख्य (50 million) पेशी तरंगत असतात. जसे समुद्राच्या तळाशी मासे इकडून तिकडे फिरतात. या पेशी सतत हालचाल करतात व ती हालचाल एका विशिष्ट लयीत होते. जी ८ ते १२ कर मध्ये चालू असते. यालाचा 'रिम्मीक ऑसीलेशनस् ऑफ सेल्स' असे म्हणतात. हे सत्य डॉ. रंडोल यांच्या संशोधनामुळे सिद्ध झाले. या लयबद्ध हालचालींमुळे पेशींना घटकद्रव्ये व ऑक्सिजन आत घेणे शक्य होते. नायटोकांड्रीया त्यामुळे ऊर्जा तयार करतात व त्यानंतर निघालेली द्रव्ये (waste products) कार्बनडायऑक्साईड बाहेर टाकतात. हे सगळं नॉर्मल शारीरिक स्थितीमध्ये शक्य असते. स्नायू, मऊ, लवचिक असतात. पेशी भोवती त्यांना हालचाल करायला पुरेशी जागा असते. पेशीभोवती वातावरण स्वच्छ असते. स्वच्छ, ऑक्सिजन युक्त रक्ताचा पुरवठा पेशींना होत असतो व भरपूर ऊर्जा तयार होत असल्यामुळे आपल्यामध्ये उत्साह असतो.

आजाराच्या स्थितीमध्ये हे सगळं उलट होते. पेशींची हालचाल मंदावते. शुद्ध ऑक्सिजयुक्त रक्ताचा पुरवठा कमी होतो. पेशींमध्ये अशुद्ध घटकांचा व गॅसेसच्या साठा होतो. परिणामी सूज येणे, अवयवांची हालचाल करणे कठीण जाणे तेथील स्नायू जखडणे, मज्ञातंतूंना ताण पडणे व वेदना होणे अशी लक्षणे जाणवू लागतात. अवयवांशी निगडीत असलेल्या संस्थेवर त्याचा परिणाम होतो. वेळीच योग्य उपचार न झाल्यास पुढे त्याचा परिणाम इतर अवयव व संस्थांवर होतो व छोट्या समस्येचे रुपांतर गंभीर आजारात होते. स्नायूंचा कडकपणा वाढण्यामुळे मज्ञातंतू व वाहिन्यापण दबल्या जातात, सांध्यांची पूर्वस्थिती बदलते व वेदना थांबता थांबत नाहीत.

वेदना शामक गोळ्या, विविध प्रकारची तेले, क्रीम, शेक, मसाज, ॲक्यूप्रेशर, ॲक्युपंक्चर इ. चा प्राथमिक उपचार झाल्यानंतर ऑपरेशन हाच एकमेव पर्याय उरतो.

डॉ. रंडोल यांच्या संशोधनावर आधारित ''मॅट्रीक्स रिदमस् थेरपी'' ने अशा समस्येवर प्रभावीपणे उपचार शक्य झाले आहेत. या उपचारपद्धतीमुळे स्नायूंचा स्टीफनेस घालवून त्यांचा लवचिकपणा पूर्ववत करते. मज्जातंतू, वाहिन्यांवरचा ताण निघून जातो. शुद्ध ऑक्सिजन युक्त रक्ताचा पुरवठा पेशींपर्यंत वाढतो व ऊर्जा निर्मितीचे कार्य पुन्हा सुरू होऊन वेदना तर थांबतातच पण तेथील अवयवांचे, संस्थेचे कार्य पूर्वपदावर येते. गेल्या दोन वर्षांपासून ही थेरपी भारतात उपलब्ध झाल्यामुळे अनेक रुग्णांना त्याचा लाभ मिळत आहे. अनेक जुनाट व इतर उपचारांनी फरक न पडलेल्यांसाठी ही उपचारपद्धती वरदान ठरत आहे. ही उपचार पद्धती वेदनारहित आहे. त्याचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. कोणत्याही वयात, इम्प्लांट असतांना, गरोदरपणात सुरक्षित आहे. विविध प्रकारच्या स्नायू, मज्जातंतू वाहिन्यांचे आजार, लकवा, पार्किनसन, सेरेब्रल पाल्सी, मायग्रेन, बऱ्या न होणाऱ्या जखमा, खेळाडूंना होणाऱ्या दुखापती मध्ये मॅट्रीक्स रीदम थेरपीचा वापर लाभदायक आहे.

**डॉ. नेहा पेळपकर, फिजिओथेरेपीस्ट.**
**(लेखकांनी स्वत: जर्मनी येथे जाऊन ह्या उपचारपद्धतीचा सखोल अभ्यास केलेला आहे.)**

---

नसे आज आई आशिर्वाद द्याया!
सारे कसे शून्य दृष्टी पथाला
नसे आज आई आशिर्वाद द्याया!

त्रिखंडात नाही दुजे श्रेष्ठ कोणी
की जो विस्मरे मातेसी कदापि
नसे शुद्ध ज्याला स्वत:च्या मनाची
असे जाण त्याला तिच्या अस्तित्वाची
जरी आज भूतली नसेल काया
तरी आज आहे तिची श्रेष्ठ माया
सारे कसे शून्य दृष्टी पथाला
नसे आज आई आशिर्वाद द्याया!
मातेविणा सृष्टी आहे उपाशी
जरी त्यास ददात ना कशाची
सदा चित्त तिचे असे पाखरासी




नसे त्यामुळे ही उणीवा कशाची
परंतु भासे कमी माऊलीची
भरू ना शके रिक्त जागा तियेची
सारे कसे शून्य दृष्टी पथाला
नसे आज आई आशिर्वाद द्याया!

**-विनयचंद्र भागवत, पुणे**

## श्री आर्यादुर्गा आरती



जय देवी जय देवी जय दुर्गे मातर जय दुर्गे मातर।
स्नेहार्तिक्यं स्वीकुरू पंचार्तिक्यं स्वीकुरू वस मे हृत्कमले।।
अनंतमहिमा दुर्गे रुपं ते विमलं रुपं ते दिव्यम्।
सुहास्यवदनं दृष्टवा मुदिंत मे चित्तम् ।।१।। जय.
सुरवंदित दुर्गे ते पदकमलं रम्यं पदकमलं हृद्यम्।
भक्तोऽहं ते दास: पाल्य परिवारम् ।।२।। जय.
तव पदकमलं सेवे जयलक्ष्मिदेवी जयदुर्गेदेवि।
श्रद्धापूजां गृहाण पालय मां नित्यम् ।।३।। जय.
राक्षस समरेवीरे दैत्येंद्रं जित्वा दैत्येंद्रं जित्वा।
स्वर्गोधर्मोदेवि सुरगणरक्षित: ।।४।। जय.
प्रसन्नवदनां रम्यां नित्यं ते दृष्टवा नित्यं ते ध्यात्वा।
स्थिरचित्तोऽहं दुर्गे वंदेऽहं सततम् ।।५।। जय.
दुर्गादासो देवी पदकलं नत्वा पदकमलं नत्वा।
चिंतनपूजां कुरू ते विधेही मांगल्यम् ।।६।। जय.
अगणित रुपाणि ते शकितस्त्वम् आद्या शक्तिस्त्वम् आद्या।
दुर्गे लक्ष्मी विजये रक्ष त्वं नित्यम् ।।७।। जय.
शक्तिं बुद्धिं भक्तिं भूतिं मे देहि भूतिं मे देही।
क्षमस्व दुर्गे देवि शिवदासो नमति ।।८।। जय.
**रचयिता– कै. पं. गोपाळ बाळकृष्ण उमर्ये, पेडणे गोवा.**

# स्पर्श फिजिओथेरेपी

डॉ. नेहा पेळपकर, फिजिओथेरेपीस्ट



येथे वेदनांवर अत्याधुनिक पद्धतीने उपचार केले जातील.

खांदेदुखी
मानदुखी
पाठदुखी
कंबरदुखी
गुडघेदुखी
टाचदुखी

शस्त्रक्रियेनंतर उपचार
खेळाडूमंधील दुखापती
जॉईंट रिप्लेसमेंट नंतरचे व्यायाम
सांधे व स्नायूंचे दुखणे

उपचारपद्धती – व्यायाम, मॅन्युअल थेरेपी, मशिनद्वारे उपचार, कायनेसिओटेपिंग, मॅट्रीक्स रिदम थेरेपी (जर्मनी)

पत्ता – वामन निवास, अभिनव प्राथमिक शाळेसमोर, दशभुजा गणपती जवळ, एरंडवणे, कर्वेनगर.
भ्रमणध्वनी – ९८२३५७५८३२ वेळ – सकाळी १० ते १.००, संध्याकाळी ३ ते ७
(पूर्वनियोजित वेळेनुसार)

WITH BEST COMPLIMENTS FROM

## मे. डी.व्ही. भाटवडेकर क्लॉथ मर्चंटस्

फोन नं. – २४४५६०४७
६४०, नारायण पेठ, न. चिं. केळकर रस्ता,
नू. म. वि. मराठी शाळेसमोर, पुणे ४११ ०३०,

कॉटन, टेरिकॉट, शर्टिंग, सुटिंग, लॉंग क्लॉथ, पॉपलीन सोलापूर चादरी बेडशीटस्, टॉवेल्स, रेडीमेड पायजमे बंडी – कुडते – बर्म्युडा – ३/४ पँटस्

अधिकृत विक्रेते
युनायटेड होजिअरी – कॅप्टन होजिअरी

## निकेत फोटोज्

कर्वेनगर शाखा

सौ. नेहा सप्रे – ९८५०८८४९४५

| | |
|---|---|
| पोर्ट फोलिओ | स्कॅनिंग |
| स्टुडिओ फोटोज् | व्ही.एच.एस. / डीव्ही कॅसेटची सीडी |
| पासपोर्ट फोटोज् | कॅमेरा रिपेअरिंग |
| रोल्स डेव्हलपिंग/प्रिंटींग | टेबल टॉप्स |
| लॅमिनेशन | इंडस्ट्रिअल फोटोग्राफी / व्हिडीओ शूटींग |
| डिजीटल मिक्सिंग फोटोज् | सर्व प्रकारच्या लहान मोठ्या कार्यक्रमांचे |
| कोलाज् | फोटो आणि व्हिडीओ शूटींग |

* अपंग किंवा दुर्धर आजारी लोकांसाठी घरी येऊन फोटो काढण्याची सुविधा

## रुग्ण दिलासा - वैद्यकीय व सामाजिक मार्गदर्शन

श्री अरुण गणपत्ये व श्री. अरुण पांडव संकलित व डॉ. सुहास नेने संपादित 'रुग्ण दिलासा – वैद्यकीय व सामाजिक मार्गदर्शन' हे पुस्तक अंजली प्रकाशन, पुणे यांनी नुकतेच प्रकाशित केले आहे. अचानक उद्भवलेल्या वैद्यकीय आणीबाणीच्या परिस्थितीत गांगरून न जाता रुग्णाला योग्य ते वैद्यकीय उपचार मिळणेसाठी करावे लागणारे खटाटोप इत्यादीबाबत तसेच वैद्यकीय परिभाषेत सर्वसामान्यांनाही सहज समजेल अशा सोप्या भाषेत दिलेली मौलिक माहिती हेच या पुस्तकाचे वैशिष्ट्य. शरीरातील महत्त्वाच्या अवयवांची माहिती, निवडक रोग आणि व्याधींचा संक्षिप्त परिचय, शक्यतो रोग होऊ नये यासाठी घ्यायवयाची काळजी याचीही माहिती या पुस्तकात दिली आहे.

याशिवाय गरीब व गरजू रुग्णांच्या वैद्यकीय उपचारासाठी आर्थिक सहाय्य देणाऱ्या संस्था, सरकारी योजना, विमा योजना, त्यासाठी सादर करावयाची कागदपत्रे, देहदान, नेत्रदान यासारख्या आधुनिक दान संकल्पनांच्या माहितीबरोबरच वैद्यकीय सेवा देणाऱ्या विविध संस्था, व्यक्ती, रक्तपेढ्या, पुणे परिसरातील वृद्धाश्रम इत्यादीसारखी मौलिक माहिती सदर पुस्तकात संकलित करण्यात आलेली आहे. त्यामुळे हे पुस्तक उत्तम मार्गदर्शक बनले आहे यात शंका नाही. ३२५ पानांच्या या पुस्तकाची किंमत रु ४५०/– इतकी असून आपल्या मागणीनुसार ते आपणांस असोसिएशनकडून सवलतीचे दरात उपलब्ध करून देणेत येईल.

संपर्क श्री. अभिजित गणपत्ये
दूरध्वनी क्र. ०२०–२४३९०१८९
Email:- abhijit.ganpatye@gmail.com

## गेले द्यायचे राहुनि तुझे नक्षत्रांचे देणे

परवा एका इंग्रजी टॅब्लॉईड वृत्तपत्रातील एका लेखाने मला विचारमग्न केले. मृत्यू समीप आलेल्या अनेक जीवांच्या अखेरच्या दिवसांचा घेतलेला एक शास्त्रीय मागोवा. वेगवेगळ्या धर्मांचे, जातींचे, पंथांचे रुग्ण, पॅलिएटिव्ह केअर हा हॉस्पाईसमधला भाग संपवून जेव्हा आपल्या घरी जातात तेव्हा परत न येण्यासाठीच हे साऱ्यांनाच ठाऊक असते. आता यापुढे फॉलो–अप नसतो; असलाच तर पुढच्या जन्मातला फॉलो–ऑन असतो. या रुग्णांना जेव्हा विचारले की, कोणत्या गोष्टींची त्यांना खंत वाटते ? काही राहून गेल्यासारखे वाटते का ? तेव्हा मिळालेल्या उत्तरांमध्ये विलक्षण साधर्म्य होते. शेवटच्या प्रवासाला निघताना त्यांनी मागे वळून पाहिल्यावर त्यांना जे जाणवले, त्यापासून अजून त्या अनंताच्या प्रवासापासून दूर असलेल्या अनेकांनी पुष्कळ काही शिकण्यासारखे आहे. प्रत्येकाला त्याच्या जीवनातले कटू क्षण, भांडणे, हेवेदावे, ऑफिसमधील कुरघोडी, जोडीदारांबरोबरचे मतभेद, अबोला, ईर्षा, स्पर्धा हे प्रकर्षाने आठवले आणि आपण त्यात आपल्या जीवनाचा अमूल्य काळ घालवला; अक्षरश: मातीमोल केला, अशी भावना झाली. ज्या वेळेला आपण त्या भावनांनी आंधळे झालो होतो, आज खऱ्या अर्थाने डोळे मिटायची वेळ आल्यावर त्या फोलपणामुळे डोळे उघडले आहेत, असे वाटू लागले. ही भांडणे, वादविवाद वेळीच मिटवले असते तर कदाचित आयुष्याला वेगळा अर्थ प्राप्त होता. जीवनात अनेकांविषयी प्रेमभावना, आवड, आदर वाटला, पण संकोचाच्या बेडय़ांनी ते व्यक्त करणे राहून गेले. गेल्या काही वर्षांत 'झप्पी' देण्याचा उदयास आलेला भाव हा अधिकाधिक वागविला असता तर शब्दाशिवाय भावना पोहोचल्या असत्या, हेही खरे आहे. पुरुषांच्या आणि काही अंशी उद्योग–व्यवसायात गर्क असलेल्या स्त्रिया कुटुंबासाठी पुरेसा वेळ काढू शकल्या नाहीत. मुले मोठी झाली, स्वतंत्र झाली, त्यांचे बालपण सरले, पण या बालपणातल्या अनेक सुंदर गोष्टींचा अनुभव यांना मुकावा लागला, कारण ते त्या वेळेत त्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासात गर्क होते. आज मागे वळून बघताना वाटतेय.., मुलांना जवळ घ्यायला हवे होते, त्यांच्या केसांमधून हात फिरवायचा राहून गेला.., त्यांना न्हाऊ–खाऊ, वेणी–फणी करायचे राहून गेले, त्यांना घोडा कधी केला नाही, आयुष्यभर जबाबदारी अन् कर्तव्याचीच ओझी अंगावर घेत आलो, पण करीअर करण्याच्या नादात मुलांना कधी अंगा खांद्यावर घेतले नाही. त्यांचे कोड–कौतुक कधी केले नाही, पैसा बक्कळ होता पण अवास्तव गरजे पोटी विनाकारण त्याच्या मागे धावत होतो. आता मुले जवळ नाहीत आणि हातही उचलवत नाही. मागे उरलीय फक्त थरथर..!!! क्षमा करायला शिकायचे राहून गेले, अपमान गिळून टाकायला शिकायचे राहून गेले. धबधब्यात भिजायचे राहून गेले.., प्रवाहा विरुद्ध पोहायचेही राहून गेले. लोक काय म्हणतील, हा प्रश्न लाथाडायचे राहून गेले. उन्मुक्त उधळून घ्यायचे राहून गेले.., उधाण वारा प्यायचे राहून गेले. नव्या पोतडीत हात घालायचा प्रयत्न करायचे राहून गेले. पराभवाच्या भीतीला ठेंगा दाखवायचे राहून गेले. साध्या – साध्या गोष्टींमध्ये खूप आनंद असतो, हे मान्य करायचे राहून गेले. लेख संपविताना माझे डोळे भरून आले आणि आरती प्रभूंच्या ओळी आठवल्या– ''गेले द्यायचे राहूनि; तुझे नक्षत्रांचे देणे..''

**– सुहास खानवलकर**


*With Best Compliments from,*


REINDEER

**Reindeer Apparels**
for
jerkins and jackets

**Manini Gurjar**

1275, Shukrawar Peth,
Neha Apartments,
Subhash Nagar, L.No. 6,
Pune - 411 002

**Phone : 020-24476336, 24483225**
**Fax : 020-24454787**
E-mail : dispomed@vsnl.com



रुग्ण दिलासा
वैद्यकीय व सामाजिक मार्गदर्शन
थोडेसे वाचा, पुष्कळ मिळवा !
एकत्र या, चिंतामुक्त व्हा, अभिव्यक्त व्हा !
संपादक : डॉ. सुहास नेने
संकलन : श्री. अरुण गणपत्ये
किंमत – ४५०/–
अंजली प्रकाशन
संपर्क – श्री. अभिजित गणपत्ये
दूरध्वनी क्र. (०२०) – २४३९०१८९
इमेल – abhijit.ganpatye@gmail.com

## संस्थावृत्त

# कऱ्हाडे ब्राह्मण संघ, कोल्हापूर

दि. १८ जानेवारी, २०१४ रोजी सायंकाळी ५ वाजता मंगलधाम येथे कऱ्हाडे ब्राह्मण संघाचा संक्रांत संमेलन कार्यक्रम झाला. हसतखेळत आयुर्वेदिक औषधांच्या टिप्स देत सकारात्मक विचार करा व निरामय जीवनाचा आनंद घ्या असे विचार फायटो फॉर्मा कंपनीचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. दिलीप गुणे यांनी व्यक्त केले. मकरसक्रांत स्नेहसंमेलनात ते बोलत होते. याचवेळी श्री. अनंत सरदेशपांडे यांनीही एल.पी.जी. गॅस ऊर्जा बचतीबाबत गृहिणींना कानमंत्र दिले व श्रोत्यांशी संवाद साधला.

संघाच्या अध्यक्षा सौ. अनुराधा गुणे यांनी प्रास्ताविकात स्वागत व सत्कार केले. डॉ. अरिन हर्डीकरांनी सत्कार मूर्तींचे परिचय करून दिले. सर्वश्री मुकुंद गर्दे, अनिरुद्ध जावडेकर व सौ. शीतल महाजनी या नवनिर्वाचित संचालकांचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन करण्यात आले. कार्यवाह धर्मराज पंडित यांनी आभार मानले. पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली. महिलांसाठी हळद-कुंकू, तिळगुळ संमेलन व चहापानानंतर कार्यक्रम संपन्न झाला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्वश्री आनंद खंडकर, विवेक सरदेसाई, मधुसुदन जावडेकर, मिलिंद पावनगडकर, मुकुंद गर्दे, अनिरुद्ध जावडेकर, सौ. शीतल महाजनी व श्रीमती शीला पाध्ये यांनी विशेष परिश्रम घेतले.

रविवार दि. ६ जून २०१४ सायंकाळी ५ वाजता संघाचे गोळवलकर सदन येथील कार्यालयात डॉ. सौ. गायत्री हर्षे यांनी शीडाच्या बोटीतून अंटार्टिका मोहीम याचा स्लाईड शो संघ सभासदांना सादर करून त्याबाबत माहिती दिली. या मोहिमेचे खास वैशिष्ट्य म्हणजे सात जणांच्या टीममध्ये त्या एकट्याच महिला होत्या आणि संपूर्ण मोहिमेचे कथन आणि त्यातील धाडसी अनुभव याचे सुमारे दोन तास वर्णन त्यांनी सर्वांना केले. कार्यक्रमास प्रतिसाद उत्तम होता. कार्यक्रम यशस्वी होण्याकरीता संघाच्या अध्यक्षा सौ. अनुराधा गुणे व कार्यकारी मंडळातील सहकार्यांनी विशेष परिश्रम घेतले.

# एक मुलखावेगळा अनोखा छंद - गणेश मूर्तींचा



वयाच्या ७३व्या वर्षीही एखाद्या तरुणालाही लाजवेल अशा तडफेने अद्यापही सल्लागार म्हणून कार्यरत असलेले व 'कऱ्हाडे ब्राह्मण संघा'चे सभासद असलेले पुण्यातील आमचे एक वयोवृद्ध वर्गणीदार स्थापत्य अभियंता श्री. प्रमोद तांबे यांच्या अनोख्या छंदातून पाच हजाराहून जास्त दुर्मिळ अशा गणेश मूर्तींचे एक आगळे-वेगळे ''गणेशालय'' श्री. तांबे यांच्या घरी साकारलेले आपल्याला पहायला मिळते.



कृषि बांधकाम विभागात उप-अभियंता म्हणून शासकीय सेवेत कार्यरत असलेल्या श्री. तांबे यांनी १९८४ मध्ये स्वेच्छा निवृत्ती घेतल्यावर पुणे जिल्हा दूध उत्पादक संघात ते मुख्य स्थापत्य अभियंता म्हणून रुजू झाले व त्याच वेळी सदाशिव पेठेत त्यांनी एक जुना वाडा खरेदी केला व १९८६ मध्ये ते तिथे रहायला आले. वाडा नव्याने खरेदी केल्यावर एके दिवशी लक्ष्मीरस्त्यावर सहज पाय मोकळे करायला म्हणून गेलेल्या प्रमोद तांबे व पत्नीला शगुनच्या चौकात एक माणूस भली मोठी लाकडी गणेश मूर्ती घेऊन जात असलेला दिसला. कुतूहल म्हणून तांबे यांच्या पत्नीने ती मूर्ती विक्रीसाठी आहे का असे त्या इसमाला विचारल्यावर त्याने 'हो' असे म्हटल्यावर तांबे यांनी केव्हढ्याला देणार असे त्याला विचारले, त्याने साडेसातशे अशी किंमत सांगितली. त्यावर तांबे यांनी अडीचशे रुपयात देणार असलास तर आम्ही घेऊ असे सांगितले, घासाघीस करून थकल्यावर अखेर तो ती गणेश मूर्ती अडीचशे रुपयात द्यायला तयार झाला. पण केवळ पाय मोकळे करण्याच्या उद्देशाने घराबाहेर पडलेल्या तांबे दांपत्याकडे त्यावेळी तेव्हढीही रक्कम नव्हती. अखेर त्यांनी त्या इसमाला तेथेच थांबायला सांगून ते स्वत: घरी जाऊन रक्कम घेऊन आले. अशा रीतीने तांबे यांचे नव्या घरी श्रीगणेशांचे आगमन झाले. वास्तुपूजेला आलेल्या तांबे यांच्या एका स्नेह्याने ती गणेश मूर्ती व त्याच दिवाणखान्यात आजूबाजूला असलेल्या इतर ५-६ गणेश मूर्तींकडे अंगुलीनिर्देश करून तांबे यांना तुम्ही काय गणेश संग्रह सुरू केला आहे का? अशी पृच्छा केली. त्यांनी त्याला त्यावेळी जरी नाही असे उत्तर दिले तरीही त्याच दिवशी तांबे पती-पत्नींनी घरांत इतरत्र शोध घेतल्यावर सगळीकडच्या मिळून तब्बल २२ गणेश मूर्ती घरात असल्याचे आढळून आले व तत्क्षणीच तांबे पती-पत्नींनी खरंच आपण आजपासून गणेश मूर्तींचा संग्रह करायला सुरू करू या असा संकल्प सोडला.

त्यानंतर तांबे यांच्या घरातील प्रत्येक व्यक्तीने जणू एकच ध्यास घेतला की आपण सर्व मिळून हा गणेश संग्रह संकल्प पूर्णत्वास नेण्यासाठी हातभार लावू या.

व्हॉलीबॉलची राष्ट्रीय खेळाडू असलेल्या त्यांच्या मुलीने त्यानंतर ती खेळासाठी भारतात जेथे जेथे गेली तेथून अनोख्या गणेश मूर्ती खरेदी करून आणल्या व संग्रहात मोलाची भर घातली. तर स्थापत्य अभियंता असलेल्या त्यांच्या मुलाने इंडोनेशिया, मलेशिया, सिंगापूर, थायलंड येथून त्या त्या देशाच्या गणेश मूर्ती आणून संग्रहात मोलाची भर घातली. वास्तविक इंडोनेशिया हे मुस्लिम राष्ट्र असले तरी पण भारताच्या चलनीनोटांवर असणाऱ्याचे तीन सिंहासारखे (अशोक स्तंभ) त्यांनी त्यांच्या चलनी नोटेवर गणेशाला स्थान दिले आहे. तांबे यांच्या संग्रहात अशी इंडोनेशियाची एक २०,००० रुपयांची चलनी नोट पहायला मिळते.

गेल्या २५ वर्षांपासून श्री. तांबे यांचे घरातील समस्त कुटुंबियांनी सहकार्यातून हा आगळावेगळा असा मुलुखावेगळा छंद जोपासला आहे व त्यात विविध माध्यमातील अत्यंत दुर्मिळ अशा 'गणेश मूर्ती' आहेत. (Museum of Lord Ganesh Idols) यामध्ये विविध माध्यमातून साकारलेली गणेशाची रुपे पहायला मिळतात. उदाहरणार्थ लाकूड, काच, कागद, कापूस, कगदाचा लगदा, लोकर, सोने, चांदी, विविधप्रकारचे दगड (Laterite, Sand, Teracotta, Marble, Granite, Gagoti etc.)शहाळे, धान्य, धातू, मणी यातून साकारलेल्या ५००० हून जास्त दुर्मिळ गणेश मूर्ती कि-चेन्स, नाईट लॅम्प्स, भेट कार्डे, लग्न पत्रिका, आगपेटी, अंगठ्या लॉकेट्स, राख्या, यांचा संग्रह आहे. प्रमोद तांबे यांच्या या मुलूखावेगळ्या छंदाची नोंद गणेश-विश्वकोषातही घेण्यात आलेली आहे. यामध्ये आपणांस क्रिकेट खेळणारे गणपती, नशापाणी करणारा गणेश, अदृश्य गणेश, अंधकारमें गणेशापासून ते लेसर गणेश व संगणकातून साकारलेल्या त्रिमिती गणेशा पर्यंत गणेशाची विविध मोहक रुपे पहावयास मिळतात. आतापर्यंत टाइम्स ऑफ इंडिया, लोकसत्ता, एशियनएज, सकाळ, पुढारी, ऐक्य, औरंगाबाद येथून प्रसिद्ध होणारे दिव्या भारती इत्यादी विविध वृत्तपत्रातून, साप्ताहिकातून, नियतकालिकातून व पुण्यच्या नेक्स्ट जनरेशन नांवाच्या टी.व्ही. न्यूज चॅनेलवर, तसेच पुणे, मुंबई, सातारा, कोल्हापूर, औरंगाबाद इत्यादि ठिकाणाहून सतत तांबे यांच्या या संग्रहाबद्दल लिहून येत असते.

त्यातील काही निवडक फोटो येथे देत आहोत. वाचकांनी तांबे यांच्या या आगळ्यावेगळ्या गणेश-संग्रहास एक वेळ अवश्य भेट द्यावीच असे आम्हांला वाटते, तांबे यांचा पत्ता व संपर्क खालीलप्रमाणे आहे.

**प्रमोद ल. तांबे, फोन- २०२-२४४७४७८३/८४४६३५३८०५**
Email: pltambe@yahoo.co.in

# कैलास मान सरोवर यात्रा - भाग २

दुसऱ्या दिवशी सकाळी सात वाजता काठमांडू येथील विमान तळावर गेलो येती एयर लाइन्सतर्फे हिमालयातील शिखरे पाहण्याची एक सफर असते. या सर्व शिखरांची माहिती विमानातील एयर होस्टेस देते. विमानातून फोटो काढण्यास परवानगी असल्याने, आपणांस खूपच छान वाटते. सर्व दृश्ये अगदी नजरेत साठवताना आपली मती अगदी गुंग होऊन जाते. प्रसंगी विमानाचा को पायलट देखील व्हिडीओ चित्रीकरणास वा फोटो काढण्यास सहकार्य करतो. प्रत्येकी सात हजार रुपये (भारतीय) तिकीट असले तरी पैसे वसूल आहेत. शिवाय जर धुक्यामुळे वा अन्य काही कारणांमुळे शिखरे दिसली नाहीत तर पैसे परत मिळतात. ही सफर एक तासाची असते.

**शिखरांची नावे व समुद्र सपाटीपासून उंची मीटरमध्ये खालील प्रमाणे :**

LANGTANG LIRUNG – 7234 M, SHISHA PANGMA - 8013 M, DORJE LAGPA 6966 M, PHURBAGHYA CHU 6637 M, CHOOBA BHAMARE - 5970 M, GAURI SHANKAR -7134 M, MELUNGTSE - 7161 M, CHUGIMAGO - 6297 M, PIGFERAGO - 6620 M, NUMBUR - 6957 M, KARYOLUNG - 6511 M, CHO OYU - 8201 M, GYACHUNGKANG - 7652 M, PUMORI - 7161 M, NUPTSE - 7855 M, SAGARMATHA (EVEREST) - 8848 M, LHOTSE - 8516 M, AMA DABLAN - 6812 M, CHAMLANG - 7319 M, MAKALU - 8463 M

परत हॉटेल वरराअल्यावर आवरले. न्याहारी केली व दिवसभर विश्रांती घेणे

**पशुपतीनाथ येथील मंदिर**



सर्वांनी पसंत केले. रात्री भोजनोत्तर दुसऱ्या दिवशीची रूपरेषा सांगितली व रात्री झोपी गेलो.

दुसऱ्या दिवशी सकाळी न्याहारी नंतर कोदारी मार्गे चीन मधील न्यालम येथे जाण्यासाठी निघालो. काठमांडू कोदारी हा १२३ किलो मिटरचा घाटातील प्रवास आहे. त्यास ४/५ तास लागतात. कोदारी येथे पोहोचल्यावर बस मधून उतरून पायी एका पुलावरून चीनच्या हद्दीत प्रवेश केला. या पुलास FRIENDSHIP BRIDGE

पहा पान २९ वर....

**भावपूर्ण श्रद्धांजली**



**भारतीय कऱ्हाडे ब्राह्मण महासंघातर्फे अभिनेत्री, निर्मात्या श्रीमती स्मिता तळवलकर यांस भावपूर्ण श्रद्धांजली !**



# आपला मुलगा/मुलगी देशाबाहेर आहे का ?
# **इंटरनेट** वरून त्यांना संपर्क करताना त्रास होतो ?

## आम्हाला कॉल करा
## आम्ही आपला त्रास
## स्वस्त दरात कमी करू.



**SDS ENTERPRISES**

**Sales**
- Desktop
  a. Branded
  b. Assembled
- Laptops
- Tables
- Printers
- Accessories

**Repairs**
- Desktop
- Laptop
- Accessories

**Solutions**
- On Internet
- Network
- Web
- Annual Maintenance
  a. Desktop
  b. Laptops
  c. Network
  d. Printers

संपर्क

**Shantanu Gurjar**

**9890990112**

**9326209282**

shantanu@sdsenterprises.net

पहा पान २७ वरुन....

**कैलास मान सरोवर यात्रा - भाग २**


असे म्हणतात. तेथे इम्मिग्रेशनचे सोपस्कार पूर्ण करून, चीनच्या हद्दीतील प्रवेश नक्की केला. आमचे सामान ट्रकने आमच्या मागोमाग आले. त्यानंतर आम्ही दुसऱ्या बस मध्ये बसलो. बस खूपच छान होती. नेपाल तिबेट मार्गावरील झान्गमू या २३०० मीटर उंचीवरील गावा मार्गे निघालो. कोदारी ते झान्मू हा घाट खूपच वेडी वाकडी वळवळणाचा, रौद्ररूप व निसर्ग सुंदर आहे. अनेक धबधबे, खुरटी झाडे, गुहा आपले लक्ष वेधून घेतात. न्यालम या ३७५० मीटर उंचीवरील ठिकाणावर जाण्यास कोदारी ते न्यालम या ३३ कि. मी. प्रवासास २ तास लागतात. न्यालम जवळ आल्यावर बर्फाच्छादित शिखरे, सुसाट गारा वारा जाणवू लागतो. न्यालम येथे रात्री नऊ वाजता पोहोचलो. सुसाट गार वारा व स्नो फौलने आमचे स्वागत केले. राहण्याची व्यवस्था बरी होती. पण थंडी खूप वाजत होती. रात्री अकरा वाजता जेवून झोपी गेलो.

दुसऱ्या दिवशी सकाळी उठल्यावर प्रत्येक आन्हिके गरम पाण्याशिवाय होत नव्हती. गरम पाण्याच्या पुरवठ्यामुळे सर्व आवरणे सोपे व सोयीचे झाले. यापुढे सर्व ठिकाणी गरम पाणी मिळणार असल्याचे जाहीर झाल्यामुळे खूपच छान व हायसे वाटले. नंतर सकाळी न्याहारी करून जवळील एक टेकडी चढण्यास गेलो. ही टेकडी जर चढली तर कैलास परिक्रमा करण्यास फारसा त्रास होत नाही. दम जरूर लागतो कारण हवेतील प्राणवायूचे प्रमाण खूप कमी होते. या वातावरणाचा सराव व्हावा म्हणून न्यालम येथे दोन दिवस मुक्काम होता. सिमेंट कॉन्क्रीट च्या इमारतींनी व नुकतेच ऊग्झअठ्ढवएछ्ढअङ ड्ढजठ्एड ने भरू लागलेले न्यालम हे गाव स्वच्छ व सुंदर आहे. बारा तारखेला सकाळी ४०० कि. मे. वरील छ्एथ ऊजछ्त्र्झअ साठी रवाना झालो. हा भाग तसा वाळवंटी, पण वाटेत याक, बर्फच्छादित शिखरे, वाळू, सरोवर, त्याचा काही गोठलेला भाग यामुळे नयनरम्य वाटतो . वाटेत एका ठिकाणी एक दुर्मिळ दृश्य दिसले. रस्त्याच्या कडेला बर्फ, त्याला लागून वाळू, त्याला लागून डोंगर, त्याला लागून पिंचू सरोवर, त्याला लागून वाळू, त्याला लागून डोंगर, त्याला लागून बर्फाचे डोंगर, निसर्गचा हा चमत्कार मी पाहतच राहिलो. शिवाय वेळ ही दुपारची होती. या प्रवासास एकूण सात तास लागले. मुक्कामी पोहोचल्यावर तेथे मातीची घरे होती वर फक्त कापड होते. थंडीची अर्थात खूप भिती वाटत होती. पण आत खोलीत उबेसाठी गोवऱ्या असलेली शेगडी होती. रात्री जेवण झाल्यावर तेथील तिबेटी मुलीने ती शेगडी पेटवून दिली. त्यामुळे रात्रभर खोलीत ऊब राहिली.

तेरा तारखेला सकाळी NEW DONGPA ते मान सरोवर हा प्रवास सागा मार्गे सुरू झाला. सागा हे तेथील एक व्यापारी व चीनच्या दृष्टीने एक महत्वाचे सैनिकी केंद्र आहे. ४५६० मीटर उंचीवरील मान सरोवरास जाण्यास सहा तासाचा प्रवास असून, तो ३७० कि.मी. मिटरचा आहे. मान सरोवर जवळ येताच कैलास पर्वत दिसू लागतो. त्याचे विलोभनीय दृश्य पाहून आपले भान हरपूनच जाते. सरोवराभोवती बसने ७२ कि. मी. प्रदक्षिणा पूर्ण केली. शांत, नितळ व स्वच्छ पाणी तसेच, सी गल सारखे पक्षी बघून मनाला खूपच समाधान वाटले. मान सरोवर त्यातील स्वच्छ, सुंदर, निळेशार पाणी बघून मती गुंग होऊन जाते. रात्री तेथे जवळच मुक्कामी राहिलो. दुसऱ्या दिवशी सकाळी उठलो तर समोरच कैलास पर्वत! एका साधूने एक ते दीड तास त्या कैलास पर्वताचे वर्णन केले. अत्यंत ओघवती शैली व समोरील कैलास पर्वत पाहून क्षणभर ध्यान लागल्यासारखे झाले. निरनिराळ्या शिव स्तोत्रातू वर्णन केलेल्या कैलासाचे त्याप्रमाणे प्रत्यक्ष दर्शन झाल्याने डोळे, मन व एकंदरीत सर्वच गात्रे तृप्त झाली. पुढे वर्णन करण्यास वाणे असमर्थ असल्याचे जाणवले.

दुपारी मान सरोवरास गेलो. पाणी खूपच थंड असल्याने फक्त प्रौक्षणावर समाधान मानले. पत्नीने सर्व शिव स्तोत्र, शिव मानस पूजा, बिल्वाष्टक... वगैरे म्हणून तृप्त, शांत व समाधानाने एक टक मान सरोवर मनात साठवून घेऊ लागली. तिच्या चेहऱ्यासमोरील असा भाव बघून जीवनाचे सार्थक झाल्यासारखे वाटले. आज १४ तारीख, वैशाळी पौर्णिमा, एक दुर्मिळ योग. या भूमीवर जो या दिवशी हजर असतो तो मुक्त होतो ही श्रद्धा! तसेच आपल्याकडे जसा कुंभ मेळा असतो तसा या वर्षी तिबेट मध्ये कजठ्एथएअठ आहे. हा पण एक सुवर्ण कांचन योग जुळून आला. रात्री पौर्णिमेचा चंद्र मान सरोवरात बघताना एक शांत, आल्हाददायक व मनोवेधक दृश्य जीवनातील अत्युच्च समाधान देऊन गेले. नंतर आम्ही दाराचेनकडे रवाना झालो. यमद्वार व तेथून कैलासाचे दर्शन घेतले. बर्फाच्या वादळामुळे कैलास परिक्रमा पूर्ण होऊ शकली नाही. काही लोक दार्फुक पर्यंत गेले व परत आले. आम्ही मात्र दार्चेन येथेच राहिलो. दार्चेन हे एक छोटेखानी व्यापारी शहर असून, येथे खूप वस्तू अत्यंत स्वस्त दरात मिळतात. दोन दिवस तेथे राहून परतीच्या प्रवास निघालो. मजल दर मजल करीत १९ तारखेला काठमांडूला परत आलो. एक दिवस तेथे विश्रांती घेऊन २१ तारखेला दिल्ली मार्गे पुण्यास परत आलो.

**समाप्त** **सुहास खानवलकर, पुणे, मो. ९३२६२१५०६०**

# ।। रेशीम गांठी ।। ®

वधू-वरांचे अनुरुप निवडीसाठी

☎ २५४६९१५८

## लग्न जमवण्यासाठी रेशीमगांठी

रेशीमगांठी वधू-वर सुचक संस्था कोथरूड मध्ये गेली सोळा वर्षे कार्यरत आहे.

**आमची वैशिष्ट्ये -**

१) भारतातील व परदेशातील पदवीधर-उच्चशिक्षित प्रथम व पुनर्विवाहाच्या स्थळांची नोंदणी

२) माफक फी - वेबसाईट फ्री ही आमची ओळख www.reshimgathi.com या वेबसाईटवर स्थळांची संपूर्ण माहिती तसेच मेळाव्याची माहिती पाहता येईल.

३) ३५ ते ४५ वयोगटातील स्थळांनां नोंदणी फी एकदाच लग्न ठरेपर्यंत राहील.

४) पौरोहित्य करणाऱ्या मुलांना नोंदणी फी एकदाच लग्न ठरे पर्यंत राहिल. पौरोहित्य करणाऱ्या मुलांची स्थळे स्विकारणाऱ्या ब्राह्मण मुलींना नोंदणी फी नाही.

५) भविष्य, कॉम्प्यूटरवर पत्रिका, गुणमेलन, विवाहपूर्व तसेच विवाहोत्तर समूपदेशनाची विशेष सोय.

६) निरनिराळ्या गटांसाठी सुनियोजित परिचय मेळावे घेतले जातात.

७) सभासद नोंदणी तसेच मेळावा नोंदणी ऑनलाईन करता येईल तसेच NEFT द्वारे नोंदणी फी पाठविता येते.

**रवींद्र देऊस्कर** **सौ. शीला दाणी-देऊस्कर**

संगमप्रेस रोड, करिष्मा समोर, कोथरूड, पुणे ३८. 25469158 / 9881152746

visit : www.reshimgathi.com e-mail : info@reshimgathi.com



# सुयश कॅटरर्स

## १९७२ पासूनची स्वादिष्ट परंपरा

आपुलकीने सेवा देणारी माणसं

- माऊली हॉल
- मिनी माऊली हॉल
- सर्वेश हॉल
- मंगलमूर्ती सभागृह
- ब्राम्हणसभा (पंडितवाडी) कल्याण.



सुहास व स्वाती पंडित यांचे भ्रमणध्वनी
९८३३३०४०३३
९८३३०४२७३३

अन्य संपर्क
सौ. गौरी सरपोतदार-९९३०८८६०४८
योगेश कानेटकर-९८१९०३९३५९

**संपूर्ण व्यवस्थापन**

सिटी मॉल, पेंढारकर कॉलेज जवळ, एम.आय.डी.सी., डोंबिवली (पूर्व)


पान १९ वरुन....

## कॅमेऱ्याच्या कोनातून

कुसुमाग्रजांच्या अनाम वीरा कवितेची आठवण झाली. अलाहाबाद हे झाशीची राणी लक्ष्मीबाई यांचे गाव हे देखील मला तिथे पाटी पाहिल्यावर समजले. वस्तीमधून, गर्दी, कचऱ्यांचे ढीग ओलांडत आम्ही पोहोचलो. ती



जागाही निर्मनुष्य होती. एक मात्र समाधान वाटले की, पुरेसा मोठा स्वच्छ परिसर, राणीचा घोड्यावरील पूर्णाकृती पुतळा आणि बाजूला रिलीफ कार्व्हिंगची शिल्पे व इतिहास हिंदी व इंग्रजी भाषेत लिहीलेला होता. आपल्य संपर्क साठी तेथील फोटो भेट म्हणून दिले व त्वरित ते मुखपृष्ठासाठी वापरले गेले याचे मोठे समाधान वाटले.



सारनाथ स्तूप येथे बुद्धाच्या प्रसारामुळे इथे परदेशी पर्यटक विशेषत: श्रीलंका, चीन, जपान विशेष करून दिसतात. त्या त्या देशाच्या गव्हर्नमेंटने खूप सारे पैसे, खर्च करून अप्रतिम देवळे–स्मारके तिथे आसपास उभी केली आहेत. मौर्य सम्राट अशोकने उभा केलेला आहे.

एकूण १० दिवसांत अनेक घाट, देवळे, रस्त्यावरील लोकं, चाट भांडार, बनारसी कपडे असे खूप बघायला मिळाले. कॅमेऱ्यात चित्रबद्ध करता आले शहरात व गावांमध्ये खूप आदराने व प्रेमाने वागणारी लोकं आढळली. बहुतेकांना पुणे माहित होतेच. बऱ्याचजणांचे नातेवाईक वा मुले पुण्यात शिकायला आहेत असे समजले.

अजून खूप गरिबी तिथे दिसते. श्रद्धेचा पगडाही अधिक जाणवतो. परंतु गंगामैय्या, काशीविश्वेश्वर यांच्या भरवशावर इथली लोक आपल्या सारख्या व विशेषत: परदेशी स्त्री–पुरुषांबरोबर खूप प्रेमाने व सहज वावरतात. नदीच्या काठांवर आता भगव्या रंगाचे कपडे परिधान केलेल्या भारतीय साधूंबरोबर परदेशी साधू साधना करताना दिसतात हे त्याचेच प्रतिक आहे असे मला वाटते.

**विवेक नारळकर, पुणे,**
**मो. ९८५०८२८२२४**

## ग्राफिटी

**अविनाश हळबे**
**मो. ९०११०६८४७२**

दिवाळीत
**'उटणे'**
लावून मंगलस्नान करण्यासाठी
सूर्योदयापूर्वी
**'उठणे'**
आवश्यक असते!

**ऋणानुबंध घराण्यांचे, संस्कार पिढ्यान् पिढ्यांचे**
(व्यवस्थापन)
**श्री अन्नपूर्णा केटरर्स**
(समर्थ डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन यांच्या मालकीचे)
**श्रुति मंगल कार्यालय**
आमचे मार्गदर्शक व आमचे सद्गुरू
**।।श्री दिगंबरदास महाराज।।**

यांच्या आशिर्वादाने श्रुति मंगल कार्यालयानं मंगल कार्याची परंपरा निर्माण केली व जपली आहे. विवाह, मौंजीबंधन अथवा कोणताही समारंभ या सर्वांतून दृग्गोचर होते घराणे व सुसंस्कृतपणा हा समारंभ संपन्न करणाऱ्या परिवारांचा. अशा साजऱ्या होणाऱ्या समारंभासाठी सुयोग्य वास्तू उपलब्ध करून देणे जिला असेल पावित्र्य मंदिराचे, जेवण असेल अन्नपूर्णेचे, सौंदर्य असेल वास्तूरचनेचे, सुख असेल आधुनिकतेचे हेच श्रुति मंगल कार्यालयाचे 'ध्येय'. बाकी कार्य सिद्धीस नेण्यास श्री समर्थ आहेतच.

**मंगल कार्यासाठी दोन स्वतंत्र हॉल**
**दुर्गा हॉल** : पहिला मजला – ३६०० चौ. फुट
वधू–वर पक्षासाठी प्रत्येकी २ खोल्या

**जानकी हॉल** : दुसरा मजला – ३६०० चौ. फुट
वधू–वर पक्षासाठी प्रत्येकी २ खोल्या (टेरेस १००० चौ. फुट)
सर्व खोल्या सेल्फ कन्टेन्ड, प्रशस्त पार्किंग, हवेशीर, भरपूर उजेड, मध्यवर्ती, उत्कृष्ट भोजन, उत्तम वाढप व्यवस्था, लिफ्टची सुविधा, शिवाय दोन मोठे जिने हे सर्व अत्यंत वाजवी दरात

**श्री अन्नपूर्णा केटरर्स**
श्री. प्रभाकर र. काजरेकर
**श्रुति मंगल कार्यालय**

१२३६, आपटे रस्ता, डेक्कन जिमखाना, पुणे – ४११ ००४
दूरध्वनी : ०२०–२५५३१७४९, २५५२१४४० फॅक्स : ०२०–२५५२१९९८
Website : www.shrutimangal.com E-mail : hrishikesh@shrutimangal.com

कऱ्हाडे ब्राह्मण संघाच्या ८१ व्या वर्षानिमित्त
हार्दिक शुभेच्छा !

# वसुधा एंटरप्रायजेस

इंटरिअर डेकोरेटर्स

श्री. नंदकुमार सप्रे ९८८१२०८८४८

■ फर्निचर ■ प्लंबिंग ■ पेंटींग ■ फॅब्रिकेशन ■ (ग्रिल्स, सेफ्टी डोअर) ■ ॲल्युमिनिअम स्लायडिंग विंडोज ■ पार्टिशन्स ■ डोअर्स पीओपी फॉल्स सिलिंग ■ लॉफ्ट टँक ■ स्टेनलेस स्टील डासांच्या जाळ्या ■ किचन ओटा एक्स्टेंशन ■ वॉल टायलिंग ■ फ्लोरिंग ■ किचन ट्रॉलीज ■ लॉफ्ट क्लोजींग ■ संडास बाथरुम वॉटरप्रुफिंग ■ बाथरुम रिनोव्हेशन ■ सन कंट्रोल फिल्म ■ वायरिंग ■ पीव्हीसी फ्लोरिंग.

वसुधा एंटरप्रायजेस म्हणजे...
... सर्व सेवा एकाच छताखाली

With Best Compliments

# Dynamic Engineers

7/2 Behind K.E.B Power Station
Udyambag – BELGAUM
590008

CMFRS. mechanical
(Railway) Jacks

P.M. Puranik
09448480607

WITH BEST COMPLIMENTS FROM

# J.P.F. Metacast Private Limited

Plot No. 7,16 & 32, S.No. 589 & 607, Machhe industrial Estate,
Belgaum 590014. Phone : 0831-2440664,
Fax: 0831-2441069 E-mail : admin@jpfmetacast.com,
Website : www.jpfmetacast.com

- 1st ISO 14001:2004 EMS FOUNDRY IN THIS REGION
- Winner of NATIONAL AWARD for Quality Products in SSI-1998
- Winner of NATIONAL AWARD for Quality Products in SSI-1998
- Winner of RAJEEV GANDHI NATIONAL QUALITY AWARD 2007
- Winner of Jayaswal Neco Quality Award 2012
- Manufacturers of CI & S G I, machined & unmachined Castings.
- ISO 9001:2008 COMPANY
- Fully machined Housing Flywheel Castings, Air Compressor Componant & Intricate Castings, Cylinder Heads.

# ।। रेशीम गांठी ।। ®

वधू-वरांचे
अनुरुप निवडीसाठी
☎ २५४६९१५८

## लग्न जमवण्यासाठी रेशीमगांठी

रेशीमगांठी वधू-वर सुचक संस्था कोथरूड मध्ये गेली सोळा वर्षे कार्यरत आहे.

**आमची वैशिष्ट्ये -**

१) भारतातील व परदेशातील पदवीधर-उच्चशिक्षित प्रथम व पुनर्विवाहाच्या स्थळांची नोंदणी
२) माफक फी - वेबसाईट फ्री ही आमची ओळख www.reshimgathi.com या वेबसाईटवर स्थळांची संपूर्ण माहिती तसेच मेळाव्याची माहिती पाहता येईल.
३) ३५ ते ४५ वयोगटातील स्थळांनां नोंदणी फी एकदाच लग्न ठरेपर्यंत राहील.
४) पौरोहित्य करणाऱ्या मुलांना नोंदणी फी एकदाच लग्न ठरे पर्यंत राहिल. पौरोहित्य करणाऱ्या मुलांची स्थळे स्विकारणाऱ्या ब्राह्मण मुलींना नोंदणी फी नाही.
५) भविष्य, कॉम्प्यूटरवर पत्रिका, गुणमेलन, विवाहपूर्व तसेच विवाहोत्तर समूपदेशनाची विशेष सोय.
६) निरनिराळ्या गटांसाठी सुनियोजित परिचय मेळावे घेतले जातात.
७) सभासद नोंदणी तसेच मेळावा नोंदणी ऑनलाईन करता येईल तसेच NEFT द्वारे नोंदणी फी पाठविता येते.

**रवींद्र देऊस्कर** **सौ. शीला दाणी-देऊस्कर**

संगमप्रेस रोड, करिष्मा समोर, कोथरूड, पुणे ३८. 25469158 / 9881152746

**visit : www.reshimgathi.com e-mail : info@reshimgathi.com**





# सुयश कॅटरर्स

## १९७२ पासूनची स्वादिष्ट परंपरा

आपुलकीने सेवा देणारी माणसं

- माऊली हॉल
- मिनी माऊली हॉल
- सर्वेश हॉल
- मंगलमूर्ती सभागृह
- ब्राम्हणसभा (पंडितवाडी) कल्याण.



**सुहास व स्वाती पंडित यांचे भ्रमणध्वनी**
९८३३३०४०३३
९८३३०४२७३३

**अन्य संपर्क**
सौ. गौरी सरपोतदार-९९३०८८६०४८
योगेश कानेटकर-९८१९०३९३५९

**संपूर्ण व्यवस्थापन**

सिटी मॉल, पेंढारकर कॉलेज जवळ, एम.आय.डी.सी., डोंबिवली (पूर्व)

कऱ्हाडे ब्राह्मण संघाच्या ८१ व्या वर्षानिमित्त
हार्दिक शुभेच्छा !

## वसुधा एंटरप्रायजेस

इंटरिअर डेकोरेटर्स

श्री. नंदकुमार सप्रे ९८८१२०८८४८

■ फर्निचर ■ प्लंबिंग ■ पेंटींग ■ फॅब्रिकेशन ■ (ग्रिल्स, सेफ्टी डोअर) ■ ॲल्युमिनिअम स्लायडिंग विंडोज ■ पार्टिशन्स ■ डोअर्स पीओपी फॉल्स सिलिंग ■ लॉफ्ट टँक ■ स्टेनलेस स्टील डासांच्या जाळ्या ■ किचन ओटा एक्स्टेंशन ■ वॉल टायलिंग ■ फ्लोरिंग ■ किचन ट्रॉलीज ■ लॉफ्ट क्लोजींग ■ संडास बाथरुम वॉटरप्रुफिंग ■ बाथरुम रिनोव्हेशन ■ सन कंट्रोल फिल्म ■ वायरिंग ■ पीव्हीसी फ्लोरिंग.

वसुधा एंटरप्रायजेस म्हणजे...
... सर्व सेवा एकाच छताखाली

With Best Compliments

## Dynamic Engineers

7/2 Behind K.E.B Power Station
Udyambag – BELGAUM
590008

CMFRS. mechanical
(Railway) Jacks

P.M. Puranik
09448480607

WITH BEST COMPLIMENTS FROM

## J.P.F. Metacast Private Limited

Plot No. 7,16 & 32, S.No. 589 & 607, Machhe industrial Estate,
Belgaum 590014. Phone : 0831-2440664,
Fax: 0831-2441069 E-mail : admin@jpfmetacast.com,
Website : www.jpfmetacast.com

- 1st ISO 14001:2004 EMS FOUNDRY IN THIS REGION
- Winner of NATIONAL AWARD for Quality Products in SSI-1998
- Winner of NATIONAL AWARD for Quality Products in SSI-1998
- Winner of RAJEEV GANDHI NATIONAL QUALITY AWARD 2007
- Winner of Jayaswal Neco Quality Award 2012
- Manufacturers of CI & S G I, machined & unmachined Castings.
- ISO 9001:2008 COMPANY
- Fully machined Housing Flywheel Castings, Air Compressor Componant & Intricate Castings, Cylinder Heads.